अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
* कॉन्ट्यूरा व्हिजन * मोतिबिंदू * काचबिंदू * नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, शुक्रवार दि. २९.०८.२०२५ | अंक नं. १२८ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020


आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505



उत्सव मजुरीचा
किमान 20% किंवा जेवढ्या वजनाचा सोन्याचा दागिना.. तेवढी टक्के मजुरीत सूट..
ऑफर 27 ऑगस्ट ते 21 सप्टेंबर 2025 पर्यंत वैध
दागिन्यांचे वजन 1 ग्रॅम ते 20 ग्रॅम पर्यंत मजुरीत मिळणारी सूट 20%
दागिन्यांचे वजन 50 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 50%
दागिन्यांचे वजन 100 ग्रॅम मजुरीत मिळणारी सूट 100%
योजनेचा नियम : सोन्याचा प्रती एक दागिना व हजर स्टॉकवर लागू.
चंदुकाका ज्वेल्स सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*

# अहिल्यानगर महापालिकेला मिळालेला स्वच्छतेचा पुरस्कार म्हणजे ओसामा बिन लादेनला शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाल्यासारखेच

## एक तर परिस्थितीमध्ये सुधारणा करा किंवा स्वच्छतेचे खोटा पुरस्कार मागे तरी घ्या; मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री यांना नगरमधून पत्र

नगर – आपल्या देशामध्ये किती मोठे मोठे विनोद होत असतात, त्याचे उदाहरण म्हणजे आमच्या अहिल्यानगर महानगरपालिकेला देशात पाचवा आणि राज्यात तिसरा स्वच्छतेबाबतचा मिळालेला पुरस्कार....! या मनपाला असा पुरस्कार मिळणे म्हणजे ओसामा बिन लादेनला शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाल्यासारखेच आहे... आता या क्षणाला देखील गणपतीच्या आराशीऐवजी ठिकठिकाणी दुर्गंधीयुक्त साचलेले कचऱ्याचे ढिगारे याची साक्ष देत आहेत.. देशात पाचवा आणि राज्यात तिसरा स्वच्छतेबाबत पुरस्कार मिळालेले आमचे शहर प्रत्यक्षात कसे आहे?

आपल्या माहितीसाठी की, गुगलवर अर्थ जीपीएस मॅप म्हणून एक मोफत ॲप उपलब्ध आहे. त्यावर जाऊन आपण आमच्या शहराचे दृश्य प्रत्यक्ष घरबसल्या पहावे. आपण देशात पाचवा आणि राज्यात तिसरा स्वच्छतेचा पुरस्कार दिलेल्या या शहरामध्ये आपल्याला फक्त नांगरलेले रस्ते आणि कचऱ्याचे ढिग, उघड्या गटारी आणि नियोजनशून्य मनपाचा कारभार दिसेल.

संपूर्ण देशात पुरस्कार मिळालेल्या या शहरातील एकूण सार्वजनिक स्वच्छतागृहांचे सुध्दा फोटोसेशन आम्ही घेतले आहे. या स्वच्छतागृहांची इतकी घाणेरडी अवस्था आहे की, येथे लघुशंका करायला आत गेलेला माणूस भडभडून उल्टीसुद्धा करून बाहेर येतो. एकावर एक फ्री... अगदी जुन्या महानगरपालिकेच्या शेजारील स्वच्छतागृहात माणूस उभा देखील राहू शकत नाही इतकी घाण आहे.. आणि या जुन्या मनपा इमारतीमध्ये असलेल्या आरोग्य विभागाच्या कार्यालयाच्या अगदी खिडकीलगत जिथे आरोग्य अधिकारी बसतात, त्याला लागूनच शेजारी प्रचंड घाण साचलेली आहे.. त्यामुळे आरोग्य अधिकाऱ्यांचे देखील आरोग्य धोक्यात आलेले असावे.

आता या सणासुदीच्या कालावधीमध्ये शहरांमध्ये असे एकही ठिकाण नाही की, त्या ठिकाणी कचऱ्याचा ढिगारा आणि दुर्गंधी साठलेली नाही. प्रत्यक्ष परिस्थितीचा लेटेस्ट ग्राउंड झिरो व्हिडिओ आम्ही उदाहरणादाखल भुतकरवाडीपासून तर आयुर्वेद कॉलेजपर्यंतचा जो अवघा तीन किलोमीटरचा रस्ता आहे. त्या एकाच रस्त्यावर सुमारे सहा ठिकाणी किती प्रचंड दुर्गंधीयुक्त कचऱ्याचे ढीग लागलेले आहेत, ते पुराव्यासह व्हिडिओ काढून असा मॅच फिक्सिंग खोटा पुरस्कार देणाऱ्या राज्य शासनाकडे पाठवले आहेत. याचा अर्थ असा, राज्य शासनाचा पुरस्कार निरीक्षण समितीच्या सदस्यांना शहरात कुठेच फिरू न देता रात्री शासकीय विश्रामगृहावर दोन-चार कोंबड्यांचा बळी दिल्यानंतर स्वच्छतेचा पुरस्कार सहज मिळतो, असे स्पष्ट होते.

सहनशील नागरिकारांचा आक्षेप वैयक्तिक कुठल्या पदावरील व्यक्ती आयुक्त किंवा लोकप्रतिनिधी यांच्यावर कुठले वैरभावना नसून, किंवा निव्वळ टिकाटिप्पणी नसून, हे लोक शासन, प्रशासनाला या शहराची इतकी वाईट अवस्था आहे, याचे खरेखुरे रिपोर्टिंग न करता खोटा आभास का निर्माण करतात? आणि निर्लज्जपणे असे खोटे पुरस्कार का स्वीकारतात? यावर खरा आक्षेप आहे.

जर अशा शहराला स्वच्छतेचा पुरस्कार मिळत असेल तर मग देशातल्या आणि राज्यातल्या इतर शहरांची तर नरकासारखी अवस्था असेल, असे समजायला हरकत नाही. वर्तमानपत्रांमधून आपले आयुक्त तथा प्रशासक कचरा उचलतानाचा अभिनय करताना फोटो दिला जातो, ते नेमका कुठला कचरा उचलतात हे सांगितले तर बरे होईल. त्यांच्याबरोबर काही इच्छुक गुडघ्याला बाशिंग बांधलेले नगरसेवक, उमेदवार येणाऱ्या निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ म्हणून एक दिवस स्वखर्चाने (?) कचरा उचलताना फोटोसेशन देखील झाले. पण निवडणुकाच लांबणीवर पडल्यामुळे ते पण गायब झाले.. मग त्यांनी कचऱ्याच्या ढिगावर आणि रस्त्यावरच्या चिखलात सुद्धा डीजेवर नाचणाऱ्या कार्यकर्त्यांना या गणेशोत्सवामध्ये खुश करायचे ठरवले असावे. त्याचा अनुभव सहनशील नगरकरांना कालच आला आहे. राज्य शासनाने सार्वजनिक गणेशोत्सव हा राज्य शासनाचा विशेष महोत्सव म्हणून जाहीर केला आणि त्यासाठी स्वच्छता आणि समाजोपयोगी आरास या निकषांवर पुन्हा एकदा प्रत्येक शहरांना स्पर्धेत भाग घेऊन ५ लाख रुपयाचे बक्षीस जाहीर केले आहे. तेव्हा जनहित परिषद व जागरूक नागरिक मंच यांच्यातर्फे हा स्वच्छतेचा खोटा पुरस्कार देणाऱ्या राज्य शासनाला असे आवाहन आहे की, सोबत पाठवलेले कचऱ्याचे ढिगारे या गणेशोत्सवामधली आमच्या शहराची स्वच्छतेची आणि समाजोपयोगी आरास समजून हादेखील पुरस्कार आमच्या अहिल्यानगरलाच देण्यात यावा. त्याच्या जोडीला एकही रस्ता आणि एकही गल्ली नियोजनशून्य पद्धतीने खोदून ठेवलेल्या रस्त्याच्या बाबतीत अजूनही अणुबॉम्ब पडल्यासारख्या भूकंप झालेल्या भग्न अवस्थेतच असल्यामुळे आमच्या शहराची ही आरास, स्वच्छतेचा आणि भग्न रस्त्यांचा हलता देखावा एकदम रिअलिस्टिक वास्तविक असाच आहे.

आता शासनाने गणेशोत्सवाच्या यावर्षीच्या पुरस्कारांसाठी दुर्गंधी, कचऱ्याचे ढिग आणि खोदून ठेवलेले रस्ते या अतिसुंदर हलत्या देखाव्याचा हा पुरस्कार एकतर आमच्याच शहराला स्वतः नगर विकास मंत्र्यांनी या शहरात येऊन पुन्हा द्यावा नाहीतर तो पहिला दिलेला स्वच्छतेचा खोटा पुरस्कार तरी मागे घ्यावा आणि ती जी कुठली पुरस्कार निवड समिती होती, त्या समितीच्या कोंबडी खाऊ सदस्यांना आमच्या शहरातले कचऱ्याचे ढीग उचलायला पाठवून द्यावे. त्यासाठी यंदाच्या गणेशोत्सवामधले आमच्या शहरातले हे नयनरम्य देखावे पाहण्यासाठी आम्ही तुम्हाला आमंत्रित करीत आहोत, असे जनहित परिषद व जागरूक नागरिक मंचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी मुख्यमंत्री, नगरविकास मंत्री, जिल्हाधिकारी, आयुक्त व सचिव यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे. *(छायाचित्र पान २ वर)*

SONI Since 1965 TILES AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720 Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज

साडी फॉल पिको, रफु सर्व प्रकारचे कपड्याचे आलर्टेशन
नगरमधील विश्वसनीय नाव
डायमंड
खिस्तगल्ली, चर्चरोड, माणिकचौक, अहिल्यानगर
9420317931

विना ऑपरेशन शिबीर
* वघळलेले कान मिनिटांतच चिटकवा
* विना ऑपरेशन रामबाण उपाय
* डोळा- मोतीबिंदू, लासुर डॉपने घालवा
* नाक- खोकला, सर्दिसाठी Asclepius
* त्वचा- पिंपल, काळे डाग, व्रण, मांस काढणे, टॅटू पुसुन टाकणे, केसांचे गोंधण काढणे
* सगळे व्यसन सोडवा नशामुक्ती स्प्रे वापरा
* दारु, गुटखा, तंबाखू, बिडी-सिगारेट हर्बल स्प्रे वापरा नशामुक्त व्हा...!
डॉ. मंजुषा 7507718246

क्षमा में अपनत्व है सम्वेदना है,
अत:कालीन एवं हमारे अपराधों के लिए
सच्चे हृदय से क्षमा प्रदान करते है।
मिच्छामी दुक्कडम्
क्षमाप्रार्थी
सीए रमेश फिरोदिया,
* चेअरमन, रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर
* सविता फिरोदिया स्कुल ऑफ इंटेरियर डिझाईन ॲण्ड डेकोरेशन
* रमेश फिरोदिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साकुर, ता. संगमनेर, जि. अ.नगर
वर्धमान हार्डवेअर
बंगाल चौकी, अहिल्यानगर. मोबा.: ९४२३७९३२२१ । ९४२३१६०१०६
सीए संजय कालाणी । रोहन फिरोदिया । साहिल फिरोदिया
• फिरोदिया - कालाणी परिवार •

श्री वैष्णव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित अहिल्यानगर.
सर्व सभासद, खातेदार, हितचिंतक यांना कळविण्यास आनंद होतो की, आपल्या पतसंस्थेच्या नुतन कार्यालयाचे
लोकार्पण सोहळा
रविवार दिनांक ३१ ऑगस्ट २०२५ सायंकाळी संपन्न होत असुन या प्रसंगी
।। श्री सत्यनारायण महापुजा ।।
आयोजित करण्यात आली आहे. तरी आपण सहकुटुंब, सहपरिवार, मित्र मंडळींसह उपस्थित राहुन कार्यक्रमाची शोभा वाढवावी व तिर्थ प्रसादाचा लाभ घ्यावा. हि नम्र विनंती.
सायंकाळी ६ ते ९ पर्यंत
* स्थळ *
पहिला मजला, सॉलीटेअर बिझनेस हब, चितळे रोड, अहिल्यानगर. फोन (०२४१) २४९५००९
E-mail : vaishnavpatsanstha@gmail.com
* आपले विनीत *
चेअरमन व संचालक मंडळ, कर्मचारी वृंद
श्री वैष्णव नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित
टिप : गणेशोत्सव व लोकार्पण सोहळ्यानिमित्त मुदत ठेव नियमित व्याजदरापेक्षा ०.२५ टक्के जादा व्याजदर दि.२९/०८/२०२५ ते दि. ०६/०९/२०२५ पर्यंत लागु

गत वर्ष मे अगर
हमसें कोई भुल हुई हो,
तो उसके लिए
हम क्षमाप्रार्थी है...
क्षमापना
क्षमाप्रार्थी
राजेंद्र चोपडा - सौ. नंदिनी राजेंद्र चोपडा
अमित राजेंद्र चोपडा - सौ. श्वेता अमित चोपडा
आरव चोपडा, अर्जुन चोपडा
समस्त चोपडा परिवार
चोपडा मोटर्स (L.L.P.) । चोपडा कन्स्ट्रक्शन्स
सथ्था कॉलनी, स्टेशन रोड, अहिल्यानगर



आपल्या किचनला बनवा आधुनिक...
आजच घेऊन या
इम्पोर्टेड किचन सिंक
मिळण्याचे ठिकाण
Satbhai Mala, Shop No 8, Delhi Gate Rd, Near Gajanan Hospital, Ahilyanagar
9145008009 / 9822542011
ABHAY SALES CORPORATION & HARDWARE



CERTIFICATE COURSE IN ADVANCE
ACCOUNTING
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
100% JOB ASSISTANCE
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistance
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
An ISO 9001:2015 Certified DiSHA COMPUTER INSTITUTE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com




शहरातील ठिकठिकाणी साचलेले कचऱ्याचे ढिग व खोदून ठेवलेले रस्ते.

## प्रार्थना आणि नवस : गणपती बाप्पा ! गुणवत्तापूर्ण दर्जेदार रस्ते निर्माण करण्याची बुद्धी दे !

गणपती बाप्पा तुझ्या आगमनाचा मोसम सुरु झाला की राज्यातील लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जणू काही अचानक जाग येते. मुख्यमंत्री, पालकमंत्री, आयुक्त, जिल्हाधिकारी हे सगळे तातडीने खड्डे बुजविण्याचे आदेश देतात. आणि मग प्रशासन पावसात पाणी साचलेल्या खड्ड्यांवर डांबर टाकून खड्डे बुजविण्याचा दिखावा करते. करदाते नागरिकांचं मात्र मन दु:खी होतं. कारण आम्ही कष्टाची कमाई सरकारला कर म्हणून देतो आणि त्या पैशातून उभारलेले रस्ते अवघ्या काही वर्षांत उखडून पडतात. ग्रामपंचायतीने तीन वर्षांपूर्वी केलेला सिमेंटचा रस्ता नंतर शोधूनही दिसत नाही. रस्त्यांमधील भ्रष्टाचार आणि कमिशनखोरी मुळे महापालिका क्षेत्रातील करोडो रुपयांचा निधी वर्षानुवर्षे धुळीस मिळतोय.

शासनाच्या आकडेवारीनुसार मागील पाच वर्षांत केवळ रस्त्यांच्या दुरुस्ती व डांबरीकरणावर तब्बल ७,५०० कोटी रुपये खर्च झाले आहेत. परंतु या खर्चातून नागरिकांना मिळालेला फायदा फक्त तात्पुरते खड्डेमुक्त रस्ते एवढाच आहे. पावसाळा सुरू झाला की हे रस्ते पुन्हा धुळीस मिळतात. परदेशातील रस्ते १५–२० वर्षं टिकतात, पण भारतातील रस्ते पावसाळा संपेपर्यंतही तग धरत नाहीत, ही वस्तुस्थिती लोकांना चीड आणणारी आहे. यामागे सगळ्यात मोठा दोष म्हणजे कमिशनखोरी. कंत्राटदार, अधिकारी आणि नेते यांचा संगनमताचा खेळ सुरू आहे. दर्जा तपासणी करणारे अधिकारीही डोळेझाक करतात, कारण त्यांनाही आपला हिस्सा मिळतो.

गणपती बाप्पा ! आम्ही तुझे निस्सीम भक्त आहोत आणि आमची तुझ्या कडे एकच प्रार्थना आहे की, तू आता तुझ्या आगमनापूर्वी खड्डे बुजवण्याची बुद्धी लोकप्रतिनिधी, प्रशासनाला देण्याऐवजी; रस्त्यांवर खड्डेच पडणार नाही, अशा प्रकारचे रस्ते बांधण्याची बुद्धी दे !;. बाप्पा ! आम्हाला याचे आश्चर्य वाटते की तू भारतात असून अन्य देशातिला यंत्रणांना बुद्धी दिल्यानंतर तिकडचे देश दर्जेदार रस्ते बांधतात मग तुझे म्हणणे येथील लोकप्रतिनिधी, प्रशासन का ऐकत नाही ? इकडच्या यंत्रणांना, नेत्यांना बुद्धीच नाही का ? असेल तर त्याचा वापर होताना का दिसत नाही ? आमचे तुझ्याकडे गाऱ्हाणे आहे की तू एकदा लोक्रातीनिधीना, नोकरशाहीला कुठलेही कमिशन न घेता व कंत्राटदारांना कुठलेही कमिशन न देता; दर्जेदार, गुणवत्तापूर्ण रस्ते निर्माण करा; असा आदेशच दे ! आपल्या देशात सांगून उपयोग होत नसतो, त्या साठी; आदेशच; आवश्यक असतात.

बाप्पा ! आम्ही करदाते नागरिक अत्यंत कष्ट करून कमावलेल्या पैशातून कर भरत असतो त्यामुळे आमच्या पै पै पैशाचा विनियोग नीटपणे व्हावा अशी आमची अपेक्षा असते. पण त्याच्या अगदी विपरीत परिस्थिती रस्त्यांवरील खर्चाच्या बाबतीत होते आहे. करोडो रुपये खर्च करून बांधलेले डांबरी रस्ते, सिमेंटचे रस्त्यांचे विसर्जन हे ४/५ वर्षातच होताना दिसते. उच्चत्तम दर व न्यूनत्तम दर्जा या सूत्रामुळे रस्ते निर्मिती, देखभाल हा प्रकार तिजोरी लूट अभियानाचा शासनमान्य प्रकार झालेला आहे.

बाप्पा ! तुझ्याकडे एक प्रार्थना आहे की, तुला मानणाऱ्या आणि गणेश उत्सवाला; राज्य महोत्सवाचा; दर्जा देणाऱ्या सरकारला सांग की करदात्या नागरिकांनी माझ्या कडे रस्त्यांच्या बाबतीत पुढील गाऱ्हाणे मांडले आहे

- दरवर्षी खड्डे बुजवण्याची वेळ का येते ?.
- करदात्यांचा पैसा उधळला जातो, त्याची जबाबदारी कोण घेणार?
- वर्षानुवर्षे दर्जाहीन रस्ते निर्माण होत असताना, रस्त्यांच्या गुणवत्तेची हमी देणारी स्वतंत्र यंत्रणा आजपर्यत का निर्माण केली नाही ?
- दरवर्षी खड्डे बुजविण्याचे आदेश दिले जातात, पण खड्डेच पडणार नाहीत असे रस्ते बांधले जातील असा आदेश रस्ते बांधणीची जबाबदार असणारे सरकार, नेते, अधिकारी कधीच का देत नाही
- ज्या चाकरमान्यांना सॉरी, सॉरी... कोकणवासीयांना सरकार गणपतीसाठी दरवर्षी टोलमाफी देऊन उपकार करते त्या सरकारला सांग की माझ्या भक्तांना टोलमाफी नको आहे, भक्तांना त्यांचे डोळे बंद होण्यापूर्वी फक्त मुंबई –गोवा महामार्ग एकदाचा पूर्ण झालेला झालेला डोळे भरून पाहायचा आहे.

बाप्पा ! सरकारला तू हे सांग की रस्त्यांच्या बाबतीत मी सरकारला आदेश देतो की :

- कमिशनशिवाय रस्त्यांची कामे व्हावीत.
- प्रत्येक रस्त्याला किमान १५ ते २० वर्षांची हमी असावी.
- दर्जा तपासणी स्वतंत्र आणि पारदर्शक यंत्रणेमार्फत व्हावी.
- खराब काम करणाऱ्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकून कठोर कारवाई व्हावी.

बाप्पा ! आम्ही करदाते नागरिक आता तुला नवस करीत आहेत की, गणपती बाप्पानेच लोकप्रतिनिधींना व नोकरशहांना दर्जेदार व टिकाऊ रस्ते बांधण्याची बुद्धी द्यावी. तू जर सरकारला आणि रस्ते बांधणाऱ्या अभियंत्यांना, कंत्रादाराना, नेत्यांना; बुद्धी दिली नाही तर आमचा खड्डेमुक्त रस्त्यांचा नवस कधीच पूर्ण होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

अजून तरी सरकार, ते चालवणारे नेते, नोकरशाही हि देवाला घाबरते हि आमची श्रद्धा आहे. त्यामुळे बाप्पा ! तू जर आदेश दिला तर नक्की आम्हा करदात्या नागरिकांचा नवस पूर्ण होईल याची खात्री आहे. ती अंधश्रदा ठरू नये. हीच तुझ्या चरणी शेवटची प्रार्थना.

**– तुझाच एक निस्सीम भक्त**

## कल्याण रोड परिसरात जागोजागी असलेल्या कचरा उचलून गणपती विसर्जनाच्या ठिकाणची बारव विहीर साफ करावी



### माजी नगरसेवक सचिन शिंदे यांची मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – कल्याण रोड परिसरातील कल्याण हायवे येथे जागोजागी कचऱ्याचे मोठे ढीग पडलेले आहेत. अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने कचऱ्याची घंटागाडी वेळेवर येत नसल्याने अनेक ठिकाणी मोठे मोठे ढीग पडलेले असल्याकारणाने मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरलेली आहे. त्यामुळे साथीचे आजार वाढलेले आहेत.

गणपती विसर्जनाच्या ठिकाणी नेप्ती नाक्या जवळील विहिरीच्या आजूबाजूला कचरा तसेच मोठे काटेरी झुडपे वाढलेली असून मोठ्या प्रमाणात अस्वच्छता आहे. या विहिरीमध्ये शहरातील गणपतींचे मोठ्या प्रमाणात विसर्जन केले जाते.

या ठिकाणचे व कल्याण रोड परिसरातील जागो जागो जागी असलेले कचऱ्याचे ढीग त्वरित हटवावे व गणपती पूर्वी संपूर्ण परिसराची स्वच्छता करून द्यावी तसेच पालिकेची घंटागाडी ही नियमित कचरा उचलण्यासाठी पाठवावी, अशी मागणी माजी नगरसेवक सचिन शिंदे यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

## केडगावमध्ये शिक्षिकेच्या गळ्यातील मंगळसूत्र पळविले

नगर – पती सोबत दुचाकीवर चाललेल्या शिक्षिकेच्या गळ्यातील मंगळसुत्र पाठीमागून काळ्या रंगाच्या मोटारसायकल वर आलेल्या चोरट्याने हिसका मारून तोडत चोरून नेल्याची घटना केडगावच्या लिंक रोड वर कारमेल हायस्कुलच्या जवळ २८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.१५ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत अर्चना संतोष चौधरी (वय ४९, रा. जिजामाता कॉलनी, भुषणनगर, केडगाव) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी या शिक्षिका असून त्या २८ ऑगस्ट रोजी सकाळी आपल्या पतीच्या समवेत दुचाकीवर शाळेत जाण्यासाठी घरून निघाल्या होत्या. भुषण नगर कडून लिंक रोड कडे जात असताना कारमेल हायस्कूल जवळ त्यांच्या पाठीमागून एका काळ्या रंगाच्या मोटारसायकलवर डोक्यात हेल्मेट घातलेला एक चोरटा आला. त्याने त्याची मोटारसायकल फिर्यादी यांच्या जवळ आणून अचानक त्यांच्या गळ्यातील मंगळसुत्र हिसकावले, त्यावेळी फिर्यादी यांनी ते मंगळसुत्र पकडल्याने त्याचा अर्धा भाग चोरट्याच्या हाती लागला. तो सुमारे २५ हजार किमतीचा मंगळसुत्राचा अर्धा भाग घेवून चोरटा भरधाव वेगात पसार झाला.

या घटनेनंतर चौधरी यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जावून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अनोळखी चोरट्या विरुद्ध बीएनएसकलम ३०९ (४) प्रमाणे जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## झाडाला गळफास घेत आत्महत्या

नगर – राहत्या घरा शेजारील शेतातील झाडाला गळफास घेत एकाने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील डोंगरगण येथील काळेवस्ती येथे २८ ऑगस्ट रोजी सकाळी उघडकीस आली आहे. शिवाजी कारभरी काळे (वय ४२, रा.काळे वस्ती, डोंगरगण, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.



मयत शिवाजी काळे

शिवाजी काळे यांनी झाडाला गळफास घेतल्याचे निदर्शनास येताच त्यांच्या नातेवाईकांनी त्यांना खाजगी रुग्णवाहिकेतून उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथील मेडिकल ऑफिसर सचिन शिंदे यांनी त्यांची तपासणी करून ते उपचारापूर्वीच मयत झाले असल्याचे घोषित केले. याबाबतचा अहवाल एमआयडीसी पोलिसांना देण्यात आला. त्यानुसार पोलिसांनी आकस्मात मृत्यूची नोंद केली आले.

मयत शिवाजी काळे यांच्या पश्चात पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे. मयत शिवाजी यांच्यावर दुपारी डोंगरगण येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.



मराठा आरक्षणाबाबत मुंबईत भूमिका मांडताना खा. निलेश लंके.

## मराठा आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी खासदार निलेश लंके मुंबईत दाखल

नगर – मराठा आरक्षणासाठी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषणास बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी खा. निलेश लंके हे मुंबईत पोहोचले असून सरकार दहा मिनिटात निर्णय घेऊ शकते, सरकारने वेळकाढूपणा न करता हा निर्णय घ्यावा अशी भूमिका खा. लंके यांनी माध्यमांशी बोलताना मांडली.

खा. लंके म्हणाले, मराठा आरक्षणाचा हा लढा अनेक वर्षांपासूनचा आहे. या लढयाला यश आले पाहिजे ही भावना माझी नव्हे तर महाराष्ट्रातील असंख्य लोकांची आहे. या आंदोलनात मुंबईतील फ्री वे वरून खा. लंके हे पायी चालले होते. त्याविषयी माध्यम प्रतिनिधींनी विचारले असता ते म्हणाले, या आंदोलनात सहभागी होण्यासाठी मी पायी चाललो काय किंवा वाहनात बसून चाललो काय याला अर्थ राहत नाही. या जनतेसोबत चालण्यात जो आनंद तो दुसरा कशामध्ये नाही. मी सरकारला सांगू इच्छितो की, आता कुठेतरी निर्णय घेतला पाहिजे, एक घाव दोन तुकडे केले पाहिजेत.

### आरक्षणाचे हे घोंगडे किती दिवस भिजत ठेवणार आहात ?

सरकारने आता निर्णय घेतला पाहिजे. निर्णय घेणे ही कुठलीही अवघड गोष्ट नाही. अगदी दहा मिनिटात सरकार निर्णय घेऊ शकते. अवघड काही नाही. मात्र ज्या स्त्रीला नांदायचे नाही तिला सतरा पळवाटा असतात, अशी या सरकारची गंमत आहे. कोर्ट, कचेरी या भानगडी काही नको. निर्णय लगेच घ्यायला हवा असे खा. लंके यांनी ठामपणे सांगितले.

आज मुंबईत पहावे तिकडे मराठा आंदोलक दिसत आहेत. या गर्दीने आज पर्यंतचे अनेक विक्रम मोडले आहेत. जनतेचा कौल, जनतेचा रेटा पाहून सरकारने निर्णय घेतला पाहिजे. गणेश उत्सव हा पवित्र उत्सव आहे. मी गणरायाला प्रार्थना करतो की सरकारला सद्बुध्दी द्यावी आणि जरांगे पाटलांच्या या लढ्याला यश यावे असे खा. लंके म्हणाले.

## श्री गणेश उत्सव २०२५ मुर्ती विसर्जनाकरिता मनपातर्फे शहराच्या विविध भागांमध्ये कृत्रिम गणेश विसर्जन कुंड

नगर – गणेश उत्सव २०२५ करीता एकाच ठिकाणी विसर्जनाकरीता गर्दी होवू नये याकरिता महानगरपालिका क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी कृत्रिम गणेश विसर्जन कुंड तयार करण्यात येणार आहेत. तसेच पारंपारीक विहरीमध्ये गणेश विसर्जन होणार आहे.

| अ. नं. | गणेश विसर्जन ठिकाण |
|---|---|
| | **सालाबादप्रमाणे पारंपारिक विसर्जन ठिकाणे** |
| १ | नगर कल्याण रोड, बाळाजीबुआ विहीर |
| २ | सावेडी, पाईपलाईन रोड, यशोदानगर विहीर |
| ३ | साईनगर, भोसले आखाडा, बुरुडगावरोड येथील आर. सी. सी. हौद |
| | **गणेश विसर्जन कृत्रिम कुंडाचे ठिकाणे** |
| १ | गांधीनगर रोड, बोल्हेगाव, भारत बेकरी चौक |
| २ | सावेडी निर्मलनगर, साईबाबा मंदिर खुली जागा |
| ३ | सावेडी, जॉगींग ट्रॅक मैदान |
| ४ | कल्याणरोड व सिना नदी मधील आयुर्वेद उद्यान मोकळी जागा |
| ५ | केडगाव देवी मंदिर समोरील जागा |
| ६ | भुषणनगर, पाण्याच्या टाकी शेजारी, केडगाव |
| ७ | सारसनगर भिंगारनाला पुलाशेजारी नाल्याशेजारी |
| ८ | शिवनेरी चौक, स्टेशनरोड |
| ९ | गोविंदपुरा, यशवंत माध्यमिक विद्यालय (गाडे शाळा) |
| १० | भिस्तबाग महलजवळ, भिस्तबाग २ ठिकाणी |
| ११ | गांधी मैदान पटांगण |
| १२ | पांजरपोळ पटांगण, मार्केटयार्ड, आंबेडकर चौक |
| १३ | दाणेडबरा |
| १४ | मोतीनगर, खुली जागा, केडगाव |
| १५ | आंबेडकर सांस्कृतिक भवन, केडगांव देवी रोड |

## लक्ष्मीबाई गुडगळ यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – वडगाव गुप्ता येथील रहिवासी लक्ष्मीबाई धोंडीबा गुडगळ (वय ८६) यांचे २९ ऑगस्ट रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर वडगाव गुप्ता वैकुंठधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अशोक, अंबालाल गुडगळ यांच्या त्या मातोश्री होत.

## आशाबाई गव्हाणे यांचे दु:खद निधन



नगर – दत्त मंदिर, गांधीनगर येथील रहिवासी सौ. आशाबाई सुधाकर गव्हाणे (वय ५५) यांचे २८ ऑगस्ट रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पती, १ मुलगा, २ मुली असा परिवार आहे. सुधाकर गव्हाणे यांच्या त्या पत्नी होत.

## नितीन कसबेकर यांचे दु:खद निधन

नगर – येथील सिद्धार्थनगर परिसरातील रहिवासी नितीन प्रभाकर कसबेकर (वय ५०) यांचे २८ ऑगस्ट रोजी दु:खद निधन झाले. ते संबोधी विद्यार्थी वसतीगृह येथे अधीक्षक होते. त्यांच्यावर सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती स्मशानभूमीत दफनविधी करण्यात आला.



त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पत्नी, ३ मुली असा परिवार आहे. ते फुले, शाहू, आंबेडकर चळवळीमधील ज्येष्ठ नेते, पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे जिल्हा प्रमुख होते.

## मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी आमदार, खासदार व मंत्र्यांनी प्रयत्न करावे



ॲड सुरेश लगड

नगर – मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मनोज जरांगे पाटलांनी जीवाच राण करून मोठ्या प्रमाणात मराठा समाजाला एकत्र करून महाराष्ट्र शासनाचे विरुद्ध आवाज उठवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्र सरकारमधे विरोधी पक्षात होते त्यावेळेस त्यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून प्रयत्न केले त्याचे व्हीडीओ समाज माध्यमातून व्हायरल झाले आहे. निदान या व्हिडिओची आठवण ठेवून मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून प्रामाणिकपणे प्रयत्न करावा. मराठा समाजाच्या आमदार, खासदार व मंत्री महोदय यांनी लाजकाज का होईना निदान जातीसाठी माती खाऊ नका, मराठा समाजावर राजकारण करणाऱ्या सर्व मराठा समाजाच्या लोकप्रतिनिधींनी या आंदोलनात सहभागी व्हा. मराठा समाज तुम्हाला कधीही विसरणार नाही अशी माझी खात्री आहे. मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून मराठा समाज संघर्ष योध्दा मनोज जरांगेपाटलांना अभुतपूर्व अशी साथ देऊन मोर्चात सामील व्हा असे आवाहन ॲड. सुरेश लगड (मो नं ८६६८३२४१८३) अहिल्यानगर यांनी केले आहे.

## एकलव्य तायक्वांदो ॲकॅडमीच्या वनश्री लष्करे व कार्तिकी वंजारे यांनी पटकावले सुवर्णपदक

नगर – खेलो इंडिया तायक्वांदो अस्मिता लीग ही स्पर्धा २१ ते २४ ऑगस्ट दरम्यान विभागीय क्रीडा संकुल येरवडा पुणे येथे झाली.

एकलव्य तायक्वांदो अक्ॅडमीच्या वनश्री लष्करे व कार्तिकी वंजारे या दोन खेळाडूंनी सुवर्णपदक मिळवले.

या यशाबद्दल त्यांना मुख्य प्रशिक्षक– गणेश वंजारे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच योगेश बिचीतकर, सचिन मरकर, मंगेश आहेर यांचेही मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबसे, महासचिव गफार पठाण, तायक्वांदो स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष – प्राध्यापक माणिकराव विधाते, सचिव घनश्याम सानप, एकलव्य तायक्वांदो ॲकॅडमीचे अध्यक्ष दिलीप सातपुते, ग्रॅंडमास्टर अल्ताफ खान यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.




एकलव्य तायक्वांदो ॲकॅडमीच्या वनश्री लष्करे व कार्तिकी वंजारे या दोन खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले. (छाया – अमित मन्यार)

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर अवयव दान देहदानाचा संकल्प



गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर द फेडरेशन ऑफ बॉडी अ‍ॅण्ड ऑर्गन डोनेशन व दिशा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अवयवदान व वृक्षारोपण जनजागृतीचा संकल्प घेण्यात आला. (छाया – अमित मन्यार)

नगर – ग्रामदैवत श्री विशाल गणपती माळीवाडाच्या साक्षीने द फेडरेशन ऑफ बॉडी अ‍ॅण्ड ऑर्गन डोनेशन व दिशा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अवयवदान व वृक्षारोपण जनजागृतीचा संकल्प घेण्यात आला. यावेळी माजी नगरसेवक बाळासाहेब बोराटे, संभाजी कदम, फेडरेशनचे दीपक पापडे, प्रकाश मुनोत, सतीश अहिरे, अवयवदात्या (किडनी डोनर) सौ.सुनीताताई थोरात व विशाल गणेश मंदिराचे पदाधिकारी उपस्थित होते.

मोठे दान अवयव दान या माहिती फलक तसेच देह व अवयव दानाची संपूर्ण माहिती व नोंदणीसाठीचा किंवा क्यू.आर. कोड असलेला फलक याचे अनावरण करण्यात आले. सदर फलक गणेशोत्सवाच्या काळात श्री गणेशाचे दर्शन घेण्यास येणाऱ्या भाविकांना माहितीसाठी मंदिराजवळ लावण्यात आलेला आहे. याप्रसंगी दीपक पापडेजा यांनी अवयव दानाची माहिती सांगताना अवयव दाते व प्रत्यक्षा यादी यातील काही लाखांचा फरक असल्याचे सांगितले. दोन महिन्यांमध्ये जेवढे मृत्यू देशात होतात त्या प्रत्येक व्यक्तीने नुसता नेत्रदानाचा संकल्प करून नेत्रदान केले तर देशात एकही नेत्रहीन व्यक्ती राहणार नाही दरवर्षी पाच लाख लोक प्रतीक्षा यादी मध्ये अवयव मिळण्यासाठी असतात, परंतु केवळ १००० व्यक्तींनाच अवयव मिळतात. अशी माहिती दिली.

यावेळी संभाजी कदम यांनी या उपक्रमाचे कौतुक करतानाच सर्व नागरिकांना आवाहन केले की जिवंत असताना अवयव दान करा, किडनी, यकृत, स्वादुपिंड हाडे त्वचा डोळे तसेच मृत्यूनंतर देहदान करावे व मृत्यूनंतर ही जीवन जगता यावे तसेच या विषयावर जनजागृती साठी संपूर्ण मदत करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

बाळासाहेब बोराटे यांनी प्रत्येक गणेश मंडळाच्या देखाव्या बरोबरच या अवयव व देहदानाचा संकल्प या विषयावर फलक लावणे फेडरेशनच्या पदाधिकाऱ्यांचे माहिती व प्रबोधन पर कार्यक्रम ठेवावे असे सुचविले व तत्काळ काही फलक लावण्यास उपस्थित कार्यकर्त्यांना सूचना केल्या याप्रसंगी आभार मानताना प्रकाश मुळत यांनी दिशा फाउंडेशनच्या झाडे लावा झाडे जगवा या उपक्रमाची माहिती दिली.

उपस्थित व्यक्तींना अवयव दान जनजागृती वेळी प्रत्येकांना एक एक झाडाचे रोपटे वाटप संभाजी कदम व बाळासाहेब बोराटे यांच्या हस्ते करण्यात आले. अधिक माहितीसाठी दिपक पापडेजा ८६०५८४९०, प्रकाश मुनोत ८६०५४९१३३, सतिष आहिरे, ९२२६३९८१९४, भारत बागरेचां ९४२३७९३३४९, हरीश नैय्यर ८९७५१११५१, हर्षल नागपुरे ८१४९६८७७०७ संपर्क करावा.

# विवा आय अ‍ॅण्ड पिडियाट्रिक सर्जरी हॉस्पिटलचे ३१ ऑगस्टला लोकार्पण



डॉ. रूपेश सिकची



डॉ.सौ.रमा कलंत्री सिकची

नगर – नगरमधील लाल टाकी रोडवरील एपी सेंट्रल येथे विवा आय अ‍ॅण्ड पिडियाट्रिक सर्जरी हॉस्पिटलचा शुभारंभ ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. अत्याधुनिक नेत्रोपचार तसेच लहान मुलांचा शस्त्रक्रियाविषयक समस्यांवर आधुनिक उपचार व सुविधांनी परिपूर्ण अशा हॉस्पिटल मध्ये सर्वोत्कृष्ट आरोग्य सेवा मिळणार आहेत, अशी माहिती डॉ. रूपेश सिकची व डॉ. सौ. रमा कलंत्री सिकची यांनी दिली.

हॉस्पिटलचे लोकार्पण आ. संग्राम जगताप, डॉ. सुजय विखे पाटील, जोधपूर एम्स येथील पिडियाट्रिक सर्जरी विभागप्रमुख डॉ. अरविंद सिन्हा, पुणे येथील केईएम हॉस्पिटल पिडियाट्रिक सर्जरी विभागप्रमुख डॉ. शशांक श्रोत्रिय, सुरेश सिकची, सौ. सरला सिकची, नांदेड येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. सौ. शैला कलंत्री व भूलतज्ज्ञ डॉ. पुरूषोत्तम कलंत्री यांच्या हस्ते होणार आहे.

हॉस्पिटल मध्ये सुसज्ज आंतररूग्ण व बाह्यरुग्ण विभाग, अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर, मेडिकल स्टोअर, ऑप्टिकल, पॅथॉलॉजी लॅब सुविधा आहेत.

पिडियाट्रिक सर्जरी विभागात नवजात अर्भकाची शस्त्रक्रिया, जन्मजात विकृतीची शस्त्रक्रिया, लहान मुलांवर दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, नवजात शिशू व लहान मुलांसाठी अतिदक्षता विभाग, लहान मुलांची सिस्टोस्कोपी, थोरॅकोस्कोपी, पिडियाट्रिक छाती विकार, मूत्र विकार व आतड्यांचे विकार शस्त्रक्रिया, लहान मुलांची कर्करोग शस्त्रक्रिया, बालकांचे अपघात उपचार उपलब्ध आहेत.

नेत्रा विभागात कॉम्प्युटर द्वारे नेत्र तपासणी, बिन टाक्याची मोतिबिंदू शस्त्रक्रिया (फेको), लहान मुलांच्या डोळ्यांचे निदान व उपचार, तिरळेपणा शस्त्रक्रिया, नासूर शस्त्रक्रिया, पापणीच्या शस्त्रक्रिया, आरओपी तपासणी, मधुमेह नेत्र चिकित्सा, काचबिंदू निदान व उपचार, कॉन्टॅक्ट लेन्स उपलब्ध आहेत. हॉस्पिटलच्या लोकार्पण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन डॉ. सिकची यांनी केले आहे.



श्रीरामपूर येथील औद्योगिक क्षेत्र कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

# औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावा

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना

नगर – औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांचे प्रश्न तातडीने मार्गी लावावेत. क्षेत्रात स्वच्छता राखून निर्माण होणाऱ्या कचऱ्याची वेळेत विल्हेवाट लावावी. औद्योगिक क्षेत्रातील अतिक्रमणे तातडीने हटवून अवैधपणे व्यवसाय करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

श्रीरामपूर येथील औद्योगिक क्षेत्र कार्यालयात जिल्हा उद्योग मित्र समितीच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, महाव्यवस्थापक दीपक शिवदास, व्यवस्थापक अशोक बेनके, क्षेत्र व्यवस्थापक दिलीप काकडे, उपअभियंता संदीप बडगे, पोलीस निरीक्षक एन. बी. देशमुख तसेच श्रीरामपूर उद्योजक संघटनांचे पदाधिकारी बाबासाहेब काळे, प्रकाश गांधी, नंदकुमार शिंदे, हरदीप सिंग सेठी आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्र, पथदिवे, रस्ते, ड्रेनेज यांसह इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. वाढीव पाणीपुरवठ्याची मागणी मान्य व्हावी यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून पाठविण्यात यावा.

औद्योगिक क्षेत्रातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस विभागाने समन्वयातून काम करावे व गस्त वाढवावी, असे निर्देशही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी बैठकीत दिले.

# रोटरीच्या व्होकेशनल एक्सलन्स अ‍ॅवॉर्डने शिवाजी पालवे यांचा गौरव

## जिल्ह्यात राबविलेल्या वृक्षारोपण आणि संवर्धन कार्याचा सन्मान



जय हिंद फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरु असलेल्या वृक्षारोपण आणि संवर्धन कार्याची दखल घेऊन फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांना रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनच्या वतीने व्होकेशनल एक्सलन्स अवार्ड प्रदान करण्यात आला.

नगर – जय हिंद फाऊंडेशनच्या माध्यमातून सुरु असलेल्या वृक्षारोपण आणि संवर्धन कार्याची दखल घेऊन फाऊंडेशनचे शिवाजी पालवे यांना रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनच्या वतीने व्होकेशनल एक्सलन्स अवार्डने गौरविण्यात आले. दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस हा सन्मान दिला जातो. पर्यावरण संवर्धनासाठी घेतलेल्या पुढाकाराबद्दल हा गौरव करण्यात आला आहे.

या सन्मान सोहळ्याच्या अध्यक्ष तथा कॅन्सर सर्जन डॉ. सतीश सोनावणे व जि.प. उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) दरेकर यांच्या हस्ते पालवे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ. विनोद मोरे, सचिव महेश गोपाळकृष्णन, उपप्रांतपाल ईश्वर बोरा, जे.जे. सायन्स अ‍ॅकॅडमीचे कृष्णकांत झा, योगेश जहागीरदार, व्होकेशनल सर्व्हिस डायरेक्टर विजय निकम, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर मिडटाऊनचे सदस्य उपस्थित होते.

शिवाजी पालवे यांनी जय हिंद फाऊंडेशनच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये विविध देवस्थाने, जिल्हा परिषद शाळा, ओपन स्पेस तसेच एक विद्यार्थी एक वृक्ष, मा के नाम एक पेड, बापाचं झाड, दशक्रिया विधी, वाढदिवस आणि कुटुंबातील मयत सदस्यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण, एक मंदिर एक वटवृक्ष असे अनेक उपक्रम राबवले. फक्त वृक्षारोपण न करता, त्याचे संवर्धन देखील करण्यात आले. जिल्ह्यामध्ये जवळपास २२ हजार ७०० झाडांचे वृक्षारोपण करणे संवर्धनाचे कार्य सुरु आहे. यामध्ये राष्ट्रीय वृक्ष वड जवळपास ४७०० झाडे लावली आहेत. जिल्ह्यात एकप्रकारे वृक्ष क्रांती चळवळ त्यांनी राबवली आहे. या कार्याची दखल घेऊन त्यांना रोटरीचा व्होकेशनल एक्सलन्स अवार्ड प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाला उपस्थित असलेले डॉ. सारिका मोरे, डॉ. प्रसाद उबाळे, रमेश वाबळे, सुजाता वाबळे, मधुर बागायत, अ‍ॅड. वैशाली कराळे, टीना इंगळे, विजय इंगळे, प्रदीप ब्रह्मा, अजय पिसुटे, प्रियंका पिसुटे, प्रतापसिंग पांडे, वर्षा पांडे, सुजाता उबाळे, प्रियंका पारीख, श्रद्धा इंगळे, हेमचंद्र इंगळे, डॉ. प्रियंका पाटील, मार्लिन एलिशा, अ‍ॅड. हेमंत कराळे यांनी पालवे यांना शुभेच्छा दिल्या.

# आडसूळ इंजिनिअरिंग कॉलेजला सर्वोत्कृष्ट टेक्निकल कॅम्पस पुरस्कार प्रदान



सर्वोत्कृष्ट टेक्निकल कॅम्पस पुरस्कार मुंबई येथे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते स्विकारताना आडसूळ टेक्निकल कॅम्पस चास, अहिल्यानगर या संस्थेचे अध्यक्ष प्रा.अनिरुद्ध आडसूळ आदी.

नगर – आडसूळ टेक्निकल कॅम्पस चास, अहिल्यानगर या महाविद्यालयाला सर्वोत्कृष्ट टेक्निकल कॅम्पस पुरस्कार मुंबई येथे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष प्रा.अनिरुद्ध आडसूळ, सेक्रेटरी डॉ. लीना आडसूळ, प्राचार्य आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. प्रदीप एम. पाटील आदींनी हा पुरस्कार स्वीकारला.

प्राचार्य आणि कॅम्पस डायरेक्टर डॉ. प्रदीप पाटील यांनी आडसूळ टेक्निकल कॅम्पस मध्ये इमारत, उच्च शिक्षित अनुभवी प्राध्यापक, उत्कृष्ट निकाल, अद्यावत व सुसज्ज प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, वाय–फाय कॅम्पस, बस सुविधा, मुला मुलींसाठी अत्यल्प दरात स्वतंत्र वस्तीगृह इत्यादी सुविधांची आहे असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय व आयआयटी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एनपीटीईएल उपक्रम देशात सर्वत्र राबविला जातो. या अंतर्गत स्वयं योजनांच्या माध्यमातून विनाशुल्क ऑनलाईन कोर्स चालवले जातात. आडसूळ टेक्निकल कॅम्पस मधील प्राध्यापक व विद्यार्थी ऑनलाइन कोर्सला नोंदणी करतात व उत्तीर्ण होतात. महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक पेटंट करिता रजिस्टर करतात, अनुभवी प्राध्यापक विद्यार्थ्यांसाठी टेक्निकल बुक्स लिहिणे व इतर महाविद्यालयांमध्ये पेपर प्रेझेंटेशन, प्रोजेक्ट इत्यादी स्पर्धेमध्ये सहभागी होतात व यश संपादित करतात. महाविद्यालयात दरवर्षी कॅम्पस ड्राईव्ह घेण्यात येतो. यामध्ये विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कंपन्यांना आमंत्रित केले जाते व ८० टक्के विद्यार्थ्यांची प्लेसमेंट करून दिली जाते. तसेच १५ टक्के विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन दिले जाते. ५ टक्के विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यासाठी मार्गदर्शन दिले जाते. महाविद्यालयात विविध स्पर्धा, वर्कशॉप, ट्रेनिंग प्रोग्रॅम आयोजित करण्यात येतात. २५ विद्यार्थ्यांसाठी एक मेंटॉर नेमण्यात येतो. या २५ विद्यार्थ्यांना सर्व प्रकारचे मार्गदर्शन व शंकाचे निरसन मेंटॉर करतो. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अथक परिश्रम घेतात व उच्च प्रतीचे शिक्षण विद्यार्थ्यांना देतात. सन २०२३ मध्ये महाविद्यालयाला नॅक समितीकडून बी प्लस प्लस ग्रेड प्रदान करण्यात आलेली आहे. मार्च २०२५ मध्ये नवी दिल्ली येथील बोर्ड ऑफ अ‍ॅक्रिडिटेशन समितीने पाहणी व परीक्षण करून सिव्हिल इंजिनिअरिंग, कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅंड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग या तीन शाखांना एनबीए मानांकन दिले आहे. या सर्व बाबींचा विचार करून सर्वोत्कृष्ट टेक्निकल कॅम्पस पुरस्कार आडसूळ इंजिनिअरिंग कॉलेला प्रदान करण्यात आला.



देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूलला सलग तिसऱ्यांदा विजेतेपद मिळाले.

# आयकॉन पब्लिक स्कूलला देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत तिसऱ्यांदा विजेतेपद

नगर – देशाच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त नगरमध्ये आयोजित आंतरशालेय देशभक्तीपर गीत गायन स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलने सलग तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवले आहे. शाळेतील ज्युनिअर गान समूहाने अतिशय सुरेल देशभक्तीपर गीते सादर करीत परीक्षकांची मने जिंकली. मुलांनी जननी जन्मभूमी या भावस्पर्शी गीताचे अतिशय सुंदर सादरीकरण करून उपस्थित श्रोत्यांच्या मनात देशभक्तीची ज्योत प्रज्वलित केली.

संगीत शिक्षक यश वाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी या स्पर्धेत गायन कला सादर केली. प्राचार्या दीपिका नगरवाला म्हणाल्या, शाळेतील मुलांचे विविध स्पर्धांमधील यश हे नेहमीच अभिमानास्पद आहे. आयकॉन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त स्पर्धेत सहभागी होवून आपली कला, गुणवत्ता सिध्द करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते.

देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धेत सलग तिसऱ्यांदा विजेतेपद मिळवण्याची कामगिरी मुलांनी केली ही अभिमानास्पद बाब आहे. सर्व विद्यार्थ्यांचे शरद मुथा एज्युकेशन ट्रस्टचे पदाधिकारी, विश्वस्त यांनी अभिनंदन केले आहे.



## गिरगावचा राजासाठी ८०० किलोचा मोदक ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंडच्या वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद

गणेशोत्सवानिमित्त गिरगावचा राजाला तब्बल ८०० किलोचा मोदक अर्पण करण्यात आला. निकडवारी लेन सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने अदानी विल्मर ग्री बिझनेस च्या सहकार्याने हा मोदक एम एम स्विटस यांनी बनविला बनविला आहे. ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंडच्या वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये याची नोंद झाली आहे. वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंडचे अध्यक्ष डॉ. मनिष कुमार व उपाध्यक्ष डॅा. दीपक हरके यांनी मंडळाचे अध्यक्ष प्रकाश कानवजे व सचिव गणेश लिंगायत यांना प्रदान केले. बेसन, साखर, दूध आणि माव्यापासून बनवलेला हा भव्य मोदक पाहण्यासाठी गणेशभक्तांनी एकच गर्दी केली होती. त्यानंतर हा मोदक भक्तांना प्रसाद म्हणून देण्यात आला

# भौतिक सुविधांचा अभाव असला तरी गुणवत्तेच्या जोरावर अव्वल ठरलेली जिल्हा परिषद शाळा





नगर – सर्वत्र जिल्हा परिषद शाळांचा पट कमी होत चालला आहे अशी तक्रार असताना करंजी डोंगराच्या कुशीत वसलेल्या भट्टीवाडी प्राथमिक शाळेचा पट मात्र अलिकडच्या काळात वेगाने वाढलेला दिसत आहे. २०१८ साली जेमतेम ४ पटसंख्या असलेली बंद पडण्याच्या मार्गावर असलेली ही शाळा स्विकारण्यासाठी कोणीही तयार होत नव्हते. अशा परिस्थितीत या शाळेत जयराम सातपुते व परमेश्वर भवर या दोन शिक्षकांची प्रशासकीय बदली झाली. त्या दोघांच्या रूपाने रूक्ष व ओसाड वाटणार्या या शाळेला जणु नवसंजीवनी मिळाली.

विजेची असुविधा, वॉल कंम्पाऊंडचा अभाव, स्वच्छतागृहाचा अभाव, बसण्यासाठी बेंच, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष अशा विविध समस्या शाळेत होत्या. दोन्ही शिक्षकांनी सुरूवातीला शाळेच्या फक्त गुणवत्तेवर भर देत पालकांचा विश्वास संपादन केला. हळुहळु इंग्रजी माध्यमात शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या मुलांना भट्टीवाडी शाळेत दाखल करायला सुरूवात केली.आपल्या मुलांना गुणवत्तापुर्ण शिक्षण मिळावे यासाठी निवडुंगे, तिसगाव, शिरापुर अशा जवळ जवळ १५ किलो मीटरच्या परिघातुन स्कुल बसने नियमितपणे मुले भट्टीवाडी शाळेत येवु लागली. ओस पडलेली शाळा पुन्हा मुलांच्या किलबीलाटाने बहरू लागली.

शाळेत भौतिक सुविधांच्या मागे न लागता दोन्ही शिक्षकांनी फक्त व फक्त मुलांच्या सर्वांगीण प्रगतीवर लक्ष केंद्रित केले त्यासाठी चाकोरीबाहेर जावुन शाळेत अनेक नाविण्यपुर्ण उपक्रम राबविले. इंग्रजी संवादिकरण, अभिनय, विविध स्पर्धा परिक्षांची तयारी, निसर्गअभ्यास सहली, वैज्ञानिक क्षेत्रभेटी, चित्रकला–हस्तकला प्रशिक्षण, नृत्यप्रशिक्षण, विविध विषयांवर प्रदर्शन, व्याख्याने, विविध क्षेत्रात नावलौकिक मिळालेल्या व्यक्तींच्या मुलाखती, मुक्तवाचनालय, निसर्गशाळा अशा विविध उपक्रमांमुळे भट्टीवाडी शाळेतील मुले विविध क्षेत्रात चमकु लागले.

स्कॉलरशिप परिक्षा, बालचित्रकला परीक्षा, गणित विज्ञान प्रदर्शन, विविध गुणदर्शन स्पर्धा अशा स्पर्धात तर शाळेने जिल्हा व राज्यस्तरावर सुयश संपादन केले. त्यामुळेच शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांचे शैक्षणिक कार्यक्रम सादर करण्यासाठी आकाशवाणी व रेडिओ तर्फे गेल्या चारवर्षांपासुन दरवर्षी आमंत्रीत केले जाते.

या शाळेच्या वैविध्यपुर्ण उपक्रमांवर जीवन शिक्षण मधुन लेख प्रसिद्ध झाले. महाराष्ट्र शासनाच्या समग्रशिक्षा विभागाने या शाळेचे अनेक उपक्रम राज्याच्या वेबसाईटवरून प्रकाशित केले, विनोबा पद्वारे सुद्धा शाळेला अनेक पुरस्कार मिळाले तर महाराष्ट्र राज्य शासनाच्या (मिपा) औरंगाबाद ने या शाळेच्या निसर्गअभ्यास सहल या उपक्रमाची अभ्यासक्रमात मोड्यूल निर्मितीसाठी निवड केली.

शाळा गुणवत्तापुर्ण झाल्याने शाळेत नवीन भौतिक सुविधा येण्यासही सुरूवात झाली. पेवींग ब्लॉक्स, सोलर सिस्टीम, इंटरॅक्टीव बोर्ड, बेंच, वॉटर प्युरीफायर, कॉम्प्यूटर, विविध क्रिडासाहीत्याबरोबरच ही आज ही शाळा चहुबाजुंनी हिरवाईने नटली आहे. सोशल सेंटर अहिल्यानगर संस्थेच्या माध्यमातुन आत्तापर्यंत या शाळेला जर्मनी, फ्रान्स, स्वित्झर्लंड, साऊथ आफ्रिका या देशातील शिक्षणप्रेमींनी भेटी दिल्या आहेत.

मुंबईहुन अभिनेते स्वप्निल क्षेत्रे यांनी नुकतीच शाळेला भेट देवुन तेथील शिक्षक व शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष संदिप क्षेत्रे यांचा सन्मान केला.

शिक्षकांच्या अभुतपुर्व प्रयत्नातुन ४ पटावरून ४० पटापर्यंत पोहचलेल्या या शाळेचा प्रवास राज्यातील सर्वच शाळांसाठी प्रेरणादायी आहे.

या शैक्षणिक कार्यामागे जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, उपशिक्षणाधिकारी शिवगुंडे मॅडम, गटशिक्षणाधिकारी शिवाजी कराड व शिक्षणविस्तार अधिकारी रामनाथ कराड, निलेश क्षिरसागर यांची प्रेरणा असल्याचे मत दोन्ही शिक्षकांनी व्यक्त केले.

भट्टीवाडी शाळेने या परिसरातील खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांशी स्पर्धा करून आपला नावलौकीक व गुणवत्ता राज्यस्तरापर्यंत नेलेली आहे, हा काळ खरोखरच भट्टीवाडी शाळेच्या इतिहासातील सुवर्णकाळ आहे. या शाळेतील दोनही शिक्षकांची एकाचवेळी पुन्हा प्रशासकीय बदली होत आहे ही खरोखरच विद्यार्थी व पालकांसाठी धक्कादायक बाब आहे. नव्याने येणाऱ्या शिक्षकांनीही त्यांच्या अध्यापनपद्धतीचे व उपक्रशिलतेचे अनुकरण करून शाळेचा नावलौकीक वाढविणे अतिशय गरजेचे असल्याचे मत मराठी अभिनेता स्वप्निल क्षेत्रे यांनी व्यक्त केले.

# भजनी मंडळांना साहित्य खरेदीसाठी मिळणार २५ हजार रुपयांचे अनुदान

## शहरातील भजनी मंडळांनी योजनेचा लाभ घ्यावा : महेंद्र गंधे



नगर – राज्यातील महायुती सरकारने महाराष्ट्राची आध्यात्मिक भजन संस्कृती टिकण्यासाठी पुढाकार घेतला आहे. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी राज्यातील भजनी मंडळांना भजनाचे साहित्य खरेदीसाठी २५ हजार रुपयांचं अनुदान देण्याची योजन सुरु केली असून त्यासाठी ५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. हे अनुदान प्राप्त करण्यासाठी भजनी मंडळानी ६ सप्टेंबरच्या आत शासनच्या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज भरून नोंदणी करणे आवश्यक आहे. भजनी मंडळांना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी माझ्या गुलमोहर रोड वरील संपर्क कार्यालयात व्यवस्था करण्यात आली आहे. अहिल्यानगर शहरातील सर्व भजनी मंडळांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे शहर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे यांनी केले आहे.

याबाबत काढण्यात आलेल्या पत्रकात महेंद्र गंधे म्हणाले आहेत की, राज्यातील महायुती सरकारने यावर्षीपासून प्रथमच गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. यानिमित्ताने राज्यात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांचे आायोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून राज्याभरातील १८०० भजनी मंडळांना भजन साहित्य खरेदीसाठी २५ हजार रुपये भांडवली अनुदान वितरण करण्यात येणार आहे. यासाठी ऑनलाईन www. mahaanudan.org या शासनाच्या वेबसाईटवर अर्ज दाखल करावेत. इच्छुकांना अर्ज भरण्यासाठी सहकार्य करण्यासाठी गुलमोहर रोडवरील भाजपच्या संपर्क कार्यालयात व्यवस्था करण्यात आली आहे.

# आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर

## संतोष बाफना यांचे प्रतिपादन; दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिरास प्रतिसाद



राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या जन्मदिना निमित्त दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिराचे दीपप्रज्वलनाने उद्घाटन करताना संतोष बाफना, रूपालीताई बाफना, सरलाबाई छल्लाणी.

नगर – आचार्य गुरुदेव आनंदऋषीजी म.सा.यांच्या आशीर्वादाने सुरू झालेले आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये मानव सेवा हीच खरी ईश्वर सेवा आहे. हे समजून आरोग्यसेवा दिली जात आहे. आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गोरगरीब रुग्णांची सेवा घडत आहे. या मोफत आरोग्य शिबिरात बाफना परिवाराला आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये सेवा करण्याचे भाग्य मिळाले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटलचे रुग्णसेवेचे कार्य दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत आहे. हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स नर्सेस व कर्मचारी निस्वार्थ भावनेने रुग्णसेवेचे कार्य करीत आहेत. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे मानवसेवेतून निर्माण झालेले आरोग्य मंदिर आहे, असे प्रतिपादन उद्योजक संतोष बाफना यांनी केले आहे.

राष्ट्रसंत आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा.यांच्या १२५ व्या जन्मदिना निमित्त दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया बिनटाका शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन संतोष बाफना, रूपालीताई बाफना, सरलाबाई छल्लाणी यांच्या हस्ते दिपप्रज्वलाने करण्यात आले. याप्रसंगी जैन सोशल फेडरेशनचे डॉ.वसंत कटारीया, डॉ.प्रकाश कांकरिया, सतीश लोढा, सुभाष मुनोत, अभय गुगळे, डॉ.आशिष भंडारी, प्रकाश छल्लाणी, वसंत चोपडा, शिबिराचे तज्ञ डॉ.भास्कर जाधव, डॉ.राहुल कांडेकर, डॉ.महेश घुगे आदी उपस्थित होते.

रूपालीताई बाफना म्हणाले, आनंदऋषीजी हॉस्पिटलचे शिबिराच्या माध्यमातून मोठ्या प्रम णात सेवा कार्य सुरू आहे. जैन सोशल फेडरेशनने या शिबिरात सहभागी होण्याची संधी बाफना परिवाराला दिल्याबद्दल शतशःऋणी आहे. भविष्यात ही सेवा करण्याची संधी बाफना परिवाराला द्यावी.

डॉ.महेश घुगे व डॉ.भास्कर जाधव म्हणाले, हॉस्पिटलमध्ये दुर्बिणीद्वारे बिनटाका शस्त्रक्रिया अत्याधुनिक पद्धतीने व यशस्वीपणे केले जात आहेत.तसेच आतडे, फुफ्फुसे व कॅन्सर या सारख्या आजारांवरील शस्त्रक्रिया दुर्बीणद्वारे केल्या जात आहे. या शिबिराचा रुग्णांनी लाभ घ्यावा. या शिबिरात २२२ रुग्णांची तपासणी करण्यात आली. सूत्रसंचालन डॉ.आशिष भंडारी यांनी केले. प्रकाश छल्लाणी यांनी आभार मानले



पेमराज सारडा महाविद्यालयात आविष्कार संशोधन स्पर्धा विषयक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

# पेमराज सारडा महाविद्यालयात आविष्कार संशोधन स्पर्धा विषयक कार्यशाळा

नगर – महाराष्ट्र राज्याचे माजी राज्यपाल एस. एम. कृष्णा यांच्या प्रेरणेने २००६ सालापासून सुरू झालेल्या आविष्कार संशोधन स्पर्धेसाठी तयारी म्हणून पेमराज सारडा महाविद्यालयात २९ ऑगस्ट रोजी आविष्कार संशोधन स्पर्धा २०२५ –२६ साठी विद्यार्थ्यांसाठी आविष्कार संशोधन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत महाविद्यालयाचे शैक्षणिक व संशोधक समन्वयक प्रा. डॉ. शैलेश निकम यांनी विद्यार्थ्यांना आविष्कार संशोधन स्पर्धेसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना आविष्कार संशोधन स्पर्धेचे स्वरूप, व्याप्ती तसेच संशोधनाचे विषय, स्पर्धेचे नियम व अटी त्याचबरोबर स्पर्धेसाठी संशोधन कसे करावे याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित होत्या.विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यावेळी त्या म्हणाल्या, ही स्पर्धा विद्यार्थी आणि त्यांच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी आयोजित केली जाते. ग्रामीण भागातील प्रतिभावान विद्यार्थ्यांचा सहभाग या स्पर्धेत वाढावा यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात या स्पर्धेत सहभागी व्हावे.

या कार्यशाळेस हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, मानद सचिव संजय जोशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी समन्वयक प्रा.राजेश पाटणी, उपप्राचार्य प्रा. मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी यांच्यासह सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रा. डॉ. दादासाहेब जवरे यांनी केले.

# श्रीक्षेत्र चास (दशपूर) येथे संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

नगर – तालुक्यातील चास येथील राजे शिवछत्रपती सांस्कृतिक भवन या ठिकाणी २९ ऑगस्ट ते ६ सप्टेंबर या कालावधीत सायंकाळी ७ ते १० या वेळेत भगवान शामसुंदर व भगवती राधाराणीच्या कृपाशीर्वादाने सर्व भाविक भक्तांना एक सुंदर पर्वणी लाभणार आहे.

कथा व्यास गुरुवर्य श्रीकृष्ण कृपांकित डॉ. विकासानंदजी मिसाळ महाराज यांच्या सुश्राव्य वाणीतून तसेच अनेक संत महंतांच्या उपस्थितीत संगीत श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा होणार आहे. अशा ज्ञानामृताच्या श्रवणाची दुर्मिळ संधी सर्व भाविक भक्तांना लाभणार आहे.

या संधीचा सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन चास ग्रामस्थांनी केले आहे.

# स्कायब्रिज गृहप्रकल्पात गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना

## लाडक्या बप्पाच पाहुणचारात महिला रममाण



स्कायब्रिज गृहप्रकल्पात उत्साही वातावरणात पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाचे स्वागत करण्यात आले.

नगर – नगरमधील बुरुडगाव रोडवरील स्कायब्रिज गृहप्रकल्पात सर्व रहिवाशांनी एकत्र येत गणेश मूर्तीची प्रतिष्ठापना केली आहे. अतिशय उत्साही वातावरणात पारंपरिक वाद्यांच्या गजरात गणरायाचे स्वागत करण्यात आले. याठिकाणी दररोज सकाळी व संध्याकाळी सर्वजण एकत्र येत आरती करतात. तसेच दहा दिवस विविध कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे सर्व महिलांनी उत्सवाचे नियोजन केले असून विविध कार्यक्रमांसाठीही महिलांनीच पुढाकार घेतला आहे.

उत्सवात गणेश झंवर, सोनाली झंवर, स्वप्निल ओस्तवाल, वृषभ बलदोटा, धर्मेंद्र बोरा, अमृतलाल कोठारी, जयश्री कोठारी, प्रकाश मुथा, रेखा मुथा, पराग मुथा, दीपिका मुथा, जितेंद्र गुगळे, स्वाती गुगळे, अमित लोढा, रूचिता लोढा, शुभम कटारिया, दीप्ती कटारिया, पुनित भंडारी, प्रतिक्षा भंडारी, सौरभ झंवर, नेहा झंवर, पियुष कटारिया, श्रेणिक गुगळे, गौतम पारेख, निनाद भळगट, सपना भळगट, संतोष मुनोत, वैशाली मुनोत, रिना मुनोत, मनोज चंगेडिया, संगिता चंगेडिया, योगेश मंत्री, अनिता मंत्री, उषा लुणिया, विजय गुंदेचा, कला गुंदेचा, भारती लोढा आदी रहिवाशी परिश्रम घेत आहेत.

गणेशोत्सवातील विविध कार्यक्रमांत लहान मुलांपासून मोठ्या पर्यंत सर्वजण उत्साहात सहभागी होत आहेत. स्कायब्रिजच्या प्रशस्त प्रांगणात होणाऱ्या या कार्यक्रमांमुळे सर्व रहिवाशांमध्ये उत्साहाचे वातावरण तयार झाले आहे. महिला अतिशय मनोभावे लाडक्या बाप्पाचा पाहुणचार करीत आहेत. गणेशोत्सव सर्वांना एकत्र आणणारा व निखळ आनंद देणारा उत्सव आहे. त्याच धर्तीवर स्कायब्रिज येथे उत्सव साजरा केला जात आहे. विविध कार्यक्रम, स्पर्धा यातून प्रत्येक जण उत्सवाचा आनंद घेत आहे.



जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय कॅरम स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक वर्ग.

# जिल्हास्तरीय कॅरम व तलवारबाजी स्पर्धेत चितांबर विद्यालयाचे यश

नगर – जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व अहिल्यानगर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या शालेय कॅरम स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलींच्या गटात महर्षी ग. ज. चितांबर विद्यालयाच्या सिद्धी साहेबा कदम हिने प्रथम क्रमांक, मनिषाकुमारी नसीब शर्मा हिने द्वितीय क्रमांक तर अंजली दशरथ शिंदे या विद्यार्थिनीने सहावा क्रमांक प्राप्त केला. तसेच जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात जय मंगेश घुगरे या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला. या चारही विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या यशाबद्दल नव विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर, सचिव निलेश वैकर, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका विभावरी रोकडे, पर्यवेक्षिका मंदा शिंदे यांनी अभिनंदन केले. या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका मंजुषा जोशी, प्रार्थना चितांबर यांनी मार्गदर्शन केले.

# ऋत्विक झंवरचे संगीत क्षेत्रात राष्ट्रीय पातळीवर यश



म्युझिकल सोलोमध्ये ऋत्विकने उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांक मिळविल्याबद्दल त्याचा सन्मान करण्यात आला.

नगर – अखिल भारतीय माहेश्वरी युवा संघटन आयोजित नेक्स्ट जन सुपर स्टार सांस्कृतिक महोत्सव – २०२५ मध्ये ऋत्विक योगेश झंवर याने आपले कौशल्य दाखवत थेट राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

या स्पर्धेचा जिल्हास्तरावरील प्रारंभिक टप्पा कोल्हार येथे झाला. म्युझिकल सोलो (वयोगट १४ ते ४०) या विभागात ऋत्विकने उत्कृष्ट सादरीकरण करून प्रथम क्रमांक मिळवला. अहमदनगर माहेश्वरी युवा संघटनेचे अध्यक्ष श्याम भूतडा तसेच सचिव संकेत मानधना यांनी स्पर्धेसाठी मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे परीक्षण सगायक व संगीतकार अक्षय बाहेती यांनी केले

यानंतर राज्यस्तरीय स्पर्धा पुणे येथे पार पडली. येथेही ऋत्विकने प्रभावी कामगिरी करून राज्य स्तरावर प्रथम क्रमांक मिळवला. अहिल्यानगर जिल्ह्याचे माहेश्वरी युवा संघटनचे अध्यक्ष महेश भराडिया व जिल्हा सांस्कृतिक मंत्री सौ.सेजल राठी यांनी या स्तरावर त्याला मार्गदर्शन केले.

राष्ट्रीयस्तरावरील स्पर्धा २४ ऑगस्ट रोजी हैद्राबाद येथे पार पडली. या स्पर्धेत तबला, ढोलक, व्हायोलिन, हार्मोनियम, माऊथ ऑर्गन, बासरी अशा विविध वाद्यांसह संगीतकलाकार देशभरातून सहभागी झाले होते. तीन टप्प्यांत ही स्पर्धा पार पडली. पहिल्या फेरीतून पाच जणांची निवड झाली, दुसर्या फेरीतून तीन जणांची निवड झाली व अखेरीस अंतिम फेरीत ऋत्विकने सर्व प्रतिस्पर्ध्यांना मागे टाकत विजेतेपद मिळवले.

नेक्स्ट जन सुपर स्टार सांस्कृतिक महोत्सव – २०२५ या राष्ट्रीय स्पर्धेचे परीक्षण कोलकात्याचे प्रख्यात संगीतकार पार्थोमुखर्जी व हैद्राबादच्या गायिका ज्योती शर्मा यांनी केले. या स्पर्धेत महाराष्ट्र प्रदेश माहेश्वरी राज्य संघटनेचे प्रदेशाध्यक्ष विनीत तोष्णीवाल व सचिव पियुषजी राठी यांचे विशेष सहकार्य लाभले.

ऋत्विक हा आयकॉन पब्लिक स्कूल, इयत्ता दहावीचा विद्यार्थी आहे. शाळेचे संगीत शिक्षक यश वाडेकर यांनी या स्पर्धेसाठी त्याला बहुमूल्य मार्गदर्शन, सराव व सहकार्य केले. आयकॉन पब्लिक स्कूलच्या प्राचार्या सौ. दीपिका नगरवाला यांनी देखील त्याला पाठबळ दिले. ऋत्विक सध्या दीपक भानुसे (बासरी वादक) पुणे यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे.

ऋत्विक हा योगेश झंवर व सौ. श्रद्धा झंवर यांचा मुलगा असून मोतीचंद झंवर यांचा नातू आहे. त्याचे काका संगणक अभियंता व तबलावादक जितेश झंवर यांनीही या स्पर्धेसाठी ऋत्विकला मार्गदर्शन केले.

# नगर तालुक्यातील आदर्शगाव हिवरेबाजार येथील चौपाळा श्री गणेश मंदिर तीर्थक्षेत्राला भक्तिपूर्वक वंदन






नगर – आपला भारत देश धार्मिक आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेला आहे. याच विविधतेत एकता आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी महाराष्ट्रात गणेशोत्सवाची सुरुवात झाली. आदर्श गाव हिवरे बाजार एक गाव एक गणपती ही परंपरा जपत आहे.

आदर्शगाव हिवरेबाजार येथील चौपाळा श्री गणेश मंदिर हे पवित्र क्षेत्र आपल्या अध्यात्मिक तेजाने भक्तांना आकर्षित करत आहे. नगर शहरापासून अवघ्या १८ किलोमीटर अंतरावर असलेले हे मंदिर, शांत नयनरम्य, डोंगराळ परिसरात वसलेले एक मनमोहक आणि पवित्र स्थान आहे. निसर्गरम्य परिसरात स्थित चौपाळा श्री गणेश मंदिराच्या जिर्णोद्धाराचे काम सप्टेंबर २०१२ रोजी सुरू करण्यात आले. कळसासह २० एप्रिल २०१३ रोजी काम पूर्ण झाले. गाभारा क्षेत्रफळ ८१ व सभामंडप क्षेत्रफळ ९०० चौरस फुट बांधकाम हिवरे बाजार, वडगाव आमली, दैठणे–गुंजाळ, टाकळी–खातगावच्या ग्रामस्थांनी लोकवर्गणीतून मंदिराचे बांधकाम केले आहे. कळस २१ फूट उंच आहे.

मंदिरात प्रवेश करण्यापूर्वी दुरूनच या गणेशाचे दर्शन घडते. पाहता क्षणीच ही मूर्ती मनात घर करते. मंदिर परिसरातील वातावरण अतिशय आनंदी आणि मनाला शांती देणारे आहे. गणेशोत्सव काळात मूर्तीच्या चेहऱ्यावरील भाव बदलत असल्याचीही काही भाविकांची श्रद्धा आहे. काहींच्या मते हा गणपती नवसाला पावतो, अशी या गणपतीची ओळख आहे.

चौपाळा श्री गणेश मंदिराचा परिसर हा गूढ शांतता आणि वृक्षराजीने सजलेला आहे. मंदिराच्या गर्भगृहातील श्री गणेशाची मूर्ती प्रसन्न असून लक्ष वेधून घेते, चौपाळा गणेश मंदिर हे एक जागृत व सिद्ध मंदिर असून चारही गावचे ग्रामस्थ नित्यनियमाने दर्शनासाठी येतात. शेतातील टोमॅटो, संत्री, मोसंबी व इतर शेतमालाचा पहिला तोडा गणपतीला वाहतात, त्यामुळे चांगला भाव व भरघोस उत्पन्न मिळते अशी शेतकऱ्यांची भावना आहे. तसेच यौवनांच्या (अहमदशाह, निजामशाह, मोगलाई) अनेक आक्रम नांपासून गणपतीनेच चार गावांचे संरक्षण केले अशी भावना लोकांची आजही आहे. नवसाला पावणारा बाप्पा म्हणून चौपाळा गणपती प्रसिद्ध आहे. येथे आलेल्या भाविकांचे समाधान व भक्तीभाव द्विगुणित होतो व आत्मिक आनंद मिळतो. हिवरेबाजारच्या पश्चिमेला एक गवताळ पठार आहे. हिवरेबाजार, दैठणे–गुंजाळ, वडगावआमली, टाकळी–खातगाव या चार गावांच्या सीमेवर सदर पठार आहे म्हणून त्याला चौपाळा नाव पडले. हा गणपती कसा तयार झाला याची आख्यायिका –एकोणीसाव्या शतकात बीदरच्या मुसलमान सलतनीच्या जाचाला कंटाळून दुधाचा व्यवसाय करणाऱ्या शिवभक्त गवळ्यांनी (गाव आळंद जिल्हा बीदर) येथून स्थलांतर केलं. गाव सोडून ते फिरत फिरत हिवरेबाजारच्या गवताळ पठारावर आले. भरपूर गवत व शेजारी वाहणारा झरा पाहून त्यांनी पठारावर वस्ती केली. गो–पालन हा लिंगायत गवळ्यांचा मुख्य व्यवसाय होता. त्याचबरोबर मेंढीपालनही ते करायचे. नगर व आसपासच्या गावात गाई म्हशीचे दूध विक्रीसाठी ते जायचे. दुधाबरोबर दुग्धजन्य पदार्थ– ताक, दही, तूप तयार करून विक्री करायचे. दही, ताक साठविण्याचे अनेक रांजण चौपाळ्याच्या पठारावर पहायला मिळतात. एकदा लिंगाप्पा बसाप्पा गवळी यांनी पिंपळाच्या वृक्षाखाली स्वयंभू श्री गणेशाची स्थापना केली. छोटसं मंदिर बांधले. पेंढारी लोक दरोडा टाकायचे. त्यासाठी पैसे ते जमिनीत गाडग्यात टाकून पुरायचे. संकट निवारणासाठी त्यांनी चौपाळा गणेश मंदिर बांधले. त्याची रोज पुजाअर्चा करायचे. जमिनीत पुरलेल्या सुवर्णमुद्राचे गाडगे एका गुराख्याला सापडल्याचेही गावकरी सांगतात. हिवरेबाजारच्या भरणाऱ्या बाजारात व्यापारी दुध, दही, ताक व तूप गवळ्याकडून घ्यायचे. नंतर दुष्काळ व महामारीच्या साथीमुळे गवळ्यांनी आपले कुटुंब कबिला घेऊन हिवरेबाजार गाव सोडले. १९०५ साली ही घराणी मिरीमाका (ता. पाथर्डी जि. अहमदनगर) येथे स्थायिक झाली. काही भाळवणी, पारनेर व अमळनेरला गेले. भाळवणीतील नागेश्वर मंदिराची स्थापना व बांधकाम गवळी समाजानेच केले असल्याचे पुरावे उपलब्ध आहेत.

ब्रम्हांडशास्त्रज्ञ कॅप्टन अशोककुमार खरात यांच्या मार्गदर्शनाखाली पद्मश्री पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली हिवरे बाजार ग्रामस्थांनी कलशारोहण समारंभ १ मे २०१३ रोजी जडेय शांतलीगेश्वर महास्वामीजी बिदर कर्नाटक, काडसिद्धेश्वर स्वामीजी कन्हेरी मठ कोल्हापूर, ह.भ.प.विठ्ठल महाराज देशमुख, ह.भ.प.विठ्ठल महाराज घुले, नारायण महाराज जाधव यांचे हस्ते झाले. चौपाळा गणेश हिवरेबाजार, वडगाव आमली, टाकळी खातगाव, दैठणे गुंजाळ ग्रामस्थांचा विघ्नहर्ता व सुखकर्ता देव आहे.






चित्रकूट गुरुकुल प्री स्कूलच्या चिमुरड्यांनी 'नोट तंत्र' ही छोटीशी शॉर्टफिल्म तयार केली आहे.

# नोट तंत्र शॉर्टफिल्मव्दारे चित्रकूट गुरूकुलच्या चिमुरड्यांनी दिला 'भ्रष्टाचार मुक्तीचा' संदेश

## कोहिनूर मॉल कॉनप्लेक्स थिएटर येथे मोठ्या पडद्यावर झळकली फिल्म

नगर – भ्रष्टाचार हि समाजाला लागलेली कीड आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात काही अपप्रवृत्ती भ्रष्टाचार करतात आणि एकूणच देशाची प्रतिमा मलिन करतात. भ्रष्टाचार रोखण्यासाठी अशा प्रवृत्तींचा बिमोड करणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार मुक्त भारत असा संकल्प करीत चित्रकूट गुरुकुल प्री स्कूलच्या चिमुरड्यांनी नोट तंत्र छोटीशी शॉर्टफिल्म तयार केली आहे. देशाच्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून ही शॉर्टफिल्म कोहिनूर मॉल कॉनप्लेक्स थिएटर येथे मोठ्या पडद्यावर दाखविण्यात आली. उपस्थित प्रत्येकाने चिमुरड्यांच्या या उद्बोधक फिल्मचे कौतुक करीत भ्रष्टाचार करायचा नाही व त्याला खतपाणी घालायचे नाही असा संकल्प केला.

संस्थेचे संचालक संजय चव्हाण यांनी मुलांच्या या उपक्रमाचे कौतुक केले. अतिशय कमी वयात मुलांनी मोठा संदेश आत्मसात केला आहे. खऱ्या अर्थाने भ्रष्टाचार मुक्त भारताचे स्वप्न या चिमुरड्यांच्या संकल्पातून साकार होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


प्राचार्या सारिका आनंद म्हणाल्या, चित्रकूट गुरुकुलमध्ये फक्त शिक्षण व मनोरंजन नव्हे तर मुलांवर बालवयातच चारित्र्य संपन्नतेचे संस्कार केले जातात. याच उपक्रमांतर्गत मुलांचा सहभाग असलेली नोट तंत्र ही शॉर्टफिल्म तयार करण्यात आली. यात मुलांनी अतिशय सुंदर पध्दतीने भ्रष्टाचारा विरोधात विचार मांडला. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली आहेत. तरीही आज अनेक क्षेत्रात भ्रष्टाचार पहायला मिळतो. या विरोधात आवाज उठवणे आवश्यक आहे. भ्रष्टाचाराला थारा न देण्यासाठी लहान वयातच मनोभूमिका तयार झाली पाहिजे. त्यादृष्टीने सर्व मुलांना विषय समजून सांगत या फिल्मची निर्मिती केली आहे. पालक वर्गानेही या उपक्रमाचे कौतुक करीत शाळेत होणारे मूल्य शिक्षण मुलांच्या भविष्यासाठी मौल्यवान असल्याचे म्हटले आहे.

विज्ञानविश्वाची माहितीपूर्ण रंजक सफर

# विज्ञानवार्ता

## सिग्नल नसलेले शहर

देशातील मोठमोठी शहरे ट्रॅफिकने अस्त आहेत. मुंबई त्यापाठोपाठ बंगळूरच्या ट्रॅफिकबद्दल तर वेगळे सांगण्याची आवश्यकताच राहिलेली नाही. त्यावर हल्ली सोशल मीडियावर मीम्स येऊ लागले आहेत. वाहतूक नियंत्रित करण्यासाठी आणि लोकांच्या सोयीसाठी अनेक ठिकाणी ट्रॅफिक सिग्नल असतात, जे ट्रॅफिकवर नियंत्रण ठेवतात. शिवाय यामुळे अपघातही कमी आहे होतात; पण कधी कधी हेच सिग्नल ट्रॅफिक होण्यासाठी कारणीभूत ठरतात, असे अनेक लोकांचे म्हणणे आहे; पण तुम्हाला भारतातील अशा शहराविषयी माहिती आहे का, जिथे ट्रॅफिक नाही आणि इथे एकही सिग्नल नाही? तर ते शहर आहे राजस्थानमधील कोटा. या शहरात रस्त्यांवरून ट्रॅफिक सिग्नल पूर्णपणे हटवण्यात आले आहेत. वाहतूक कोंडीतून सुटका करण्यासाठी याठिकाणी अंडरपास बांधण्यात आले आणि त्या कारणामुळे येथे वाहतुकीचा प्रश्न सुटला आहे.






## सापडले मायासंस्कृतीमधील शहराचे अवशेष

मेक्सिकोतील युकाटन प्रायद्विपवर १५०० वर्षांपूर्वीच्या माया संस्कृतीमधील एका विशाल शहराचे अवशेष सापडले आहेत. हा शोध लेसर सर्व्हे किंवा लिडर तंत्रज्ञानाच्या साहाय्याने लावण्यात आला. 'जर्नल ॲंटिक्विटी'ने याबाबतच्या संशोधनाची माहिती प्रसिद्ध केली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की या शहरामधील ६,६७४ पुरातन वास्तुरचना शोधण्यात आल्या. त्यामध्ये इट्जा व टिकालसारख्या पिरॅमिड्सचा समावेश आहे.

संशोधकांनी या शहराचा छडा लिडार मॅप्सचा वापर करून लावला. त्याचा वापर जमिनीवर लेसर पल्स शूट करून केला जात असतो. लिडार तंत्र आल्यापासून जमिनीखाली गाडल्या गेलेल्या प्राचीन वसाहतींचा शोध घेणे हे सोपे झाले आहे. मात्र हे तंत्रज्ञान महागडेही आहे. ॲरिझोना विद्यापीठातील पुरातत्त्व संशोधक ल्यूक ऑल्ड-थॉमस यांनी याबाबतचे संशोधन केले. त्यांनी सांगितले की जुन्या काळात हे तंत्र नव्हते व त्यामुळे अशा प्रकारचे शोध लावणे ही सहजसोपी बाब नव्हती. आता या क्षेत्रात लिडार सर्व्हेक्षण आल्याने नवी सुविधा निर्माण झाली आहे. थॉमस यांनी यापूर्वी मेक्सिकोच्या जंगलात करण्यात आलेल्या लिडार अध्ययनांचाही वापर केला. त्यांनी मेक्सिकोच्या पूर्व-मध्य कॅम्पेचेमधील ५० चौरस मैलाच्या जागेचे विश्लेषण केले.

या ठिकाणी कधीही माया संस्कृतीचे अवशेष सापडतील याची कल्पना करण्यात आली नव्हती किंवा तसे अवशेष सापडले नव्हते. थॉमस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना याठिकाणी दडलेल्या माया शहराच्या खुणा सापडल्या. संशोधकांनी या शहराला तेथील गोड्या पाण्याच्या 'वेलेरियाना' नावाच्या लगूनचे नाव दिले आहे. हे शहर इसवी सन २५० ते ९०० या काळातील आहे. या शहरात माया संस्कृतीमधील राजधानीची सर्व लक्षणे आहेत. एक मोठा राजमार्ग, मंदिर-पिरॅमिड तसेच एका बॉल कोर्टशी जोडलेल्या प्लाझाचाही समावेश आहे. हे शहर आजूबाजूच्या डोंगरांपर्यंत फैलावले होते व डोंगरांवरही घरे होती.




## महिनाभर झोपवणारे गाव

आ जगातल्या प्रत्येक देशाची वेगळी परंपरा आणि वातावरण आहे. प्रत्येक देश खास अशा वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींसाठी ओळखला जातो; पण जगात असे एक गाव आहे, जिथे लोक महिनोन्‌महिने झोपतात. कझाकस्तानमधील कलाची गाव झोपेसाठी ओळखले जाते. इथले लोक अचानक झोपी जातात आणि ते अनेक महिने झोपून राहतात. त्यांची झोप सहसा मोडत नाही. २०१० मध्ये असा प्रकार पहिल्यांदा घडल्याचे दिसून आले. त्या वेळी शाळकरी मुले अचानक जमिनीवर कोसळली. ही सर्व मुले झोपली असल्याचे नंतर लक्षात आले. मग हळूहळू हा आजार गावात सर्वत्र पसरला. आम्हाला झोप आलीय असे अजिबात समजत नाही, असे तिथले लोक सांगतात. या लोकांना स्नान करताना, जेवताना किंवा अगदी चालता चालता केव्हाही झोप येते. या लोकांना स्लीपी हॉलो हा गूढ आजार झाला आहे. या आजारावर कोणतेच उपचार उपलब्ध नाहीत. कदाचित धक्का बसेल; पण जेव्हा इथल्या लोकांना झोप येते तेव्हा ते बसल्या बसल्या, बोलताना किंवा चालताना आहे त्या जागेवर झोपतात. अनेकदा ते कित्येक महिने आहे त्या स्थितीत झोपून राहतात. महिनोन्‌महिने त्यांची झोप मोडत नाही. ही विचित्र किंवा अविश्वसनीय वाटली, तरी खरी गोष्ट आहे. पटकन यावर कोणाचा विश्वास बसणे अत्यंत अवघड अशीच गोष्ट आहे.आरोग्यासाठी पुरेशी झोप महत्त्वाची आहे. आजकाल लोकांमध्ये झोपेच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यात पुरेशी झोप न मिळणे, अर्धवट झोप होणे अशा तक्रारींचा समावेश असतो. ही एक बाजू असली, तरीपण काही वेळा जास्त वेळ झोपणे आरोग्यासाठी त्रासदायक ठरू शकते; पण जगात एक देश असा आहे, जिथे लोकांच्या झोपेचे गणित जरा विचित्र आहे. या देशातले लोक अचानक कुठेही झोपतात. ते एकदा झोपले की, महिनोन्‌महिने झोपेतून उठत नाहीत.

आरोग्यासाठी पुरेशी झोप महत्त्वाची आहे. आजकाल लोकांमध्ये झोपेच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यात पुरेशी झोप न मिळणे, अर्धवट झोप होणे अशा तक्रारींचा समावेश असतो. ही एक बाजू असली, तरीपण काही वेळा जास्त वेळ झोपणे आरोग्यासाठी त्रासदायक ठरू शकते; पण जगात एक देश असा आहे, जिथे लोकांच्या झोपेचे गणित जरा विचित्र आहे. या देशातले लोक अचानक कुठेही झोपतात. ते एकदा झोपले की, महिनोन्‌महिने झोपेतून उठत नाहीत.

जगातल्या प्रत्येक देशाची वेगळी परंपरा आणि वातावरण आहे. प्रत्येक देश खास अशा वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींसाठी ओळखला जातो; पण जगात असे एक गाव आहे, जिथे लोक महिनोन्‌महिने झोपतात. कझाकस्तानमधील कलाची गाव झोपेसाठी ओळखले जाते. इथले लोक अचानक झोपी जातात आणि ते अनेक महिने झोपून राहतात. त्यांची झोप सहसा मोडत नाही. २०१० मध्ये असा प्रकार पहिल्यांदा घडल्याचे दिसून आले. त्या वेळी शाळकरी मुले अचानक जमिनीवर कोसळली. ही सर्व मुले झोपली असल्याचे नंतर लक्षात आले. मग हळूहळू हा आजार गावात सर्वत्र पसरला. आम्हाला झोप आलीय असे अजिबात समजत नाही, असे तिथले लोक सांगतात. या लोकांना स्नान करताना, जेवताना किंवा अगदी चालता चालता केव्हाही झोप येते. या लोकांना स्लीपी हॉलो हा गूढ आजार झाला आहे. या आजारावर कोणतेच उपचार उपलब्ध नाहीत. कदाचित धक्का बसेल; पण जेव्हा इथल्या लोकांना झोप येते तेव्हा ते बसल्या बसल्या, बोलताना किंवा चालताना आहे त्या जागेवर झोपतात. अनेकदा ते कित्येक महिने आहे त्या स्थितीत झोपून राहतात. महिनोन्‌महिने त्यांची झोप मोडत नाही. ही विचित्र किंवा अविश्वसनीय वाटली, तरी खरी गोष्ट आहे. पटकन यावर कोणाचा विश्वास बसणे अत्यंत अवघड अशीच गोष्ट आहे.

## सर्वात महागडे मोजे



हातमोजे आणि पायमोजे असे दोन प्रकारचे मोजे असतात. असे मोजे लोकरीपासूनही बनवले जातात. एक जोडी मोजे ५० रुपये ते ५ हजारांपर्यंत मिळतात. मात्र, तुम्हाला माहितीये का जगातील सर्वात महागडे मोजे कोणते ? पृथ्वीवरील सर्वात महागडे मोजे कुठे मिळतात आणि त्याची किंमत किती आहे हे जाणून घेऊया.

जगातील सर्वात महागडे मोजे लंडन सॉक कंपनी फाल्के ही बनवते. ही कंपनी त्याच्या लग्झरी मोज्यांसाठी संपूर्ण जगात प्रसिद्ध आहे. ही कंपनी लामा नावाच्या प्राण्याच्या लोकरीपासून जगातील सर्वात महागडा मोजा बनवते. हे मोजे बाजारात आल्यानंतर खूप चर्चेत होते. या खास मोज्यांची किंमत ११८८ डॉलर इतकी आहे. भारतीय रुपयांमध्ये या एका मोज्याची किंमत एक लाख रुपयांनी सुरू होते. लामा एक कॅमिलिड प्राण्याच्या दक्षिण अमेरिकामध्ये आढळतो. या दुर्मीळ प्राण्याचा वापर ओझे वाहण्यासाठी, लोकर आणि मांस मिळवण्यासाठी करतात.

## धूम जादूई रेल्वेची



एकाच वेळी दोन स्थानकांवरून धावणाऱ्या गाड्यांची संख्या अनेक आहे; मात्र तीन स्थानकांवरून एकाच वेळी एकच गाडी धावते. ही ट्रेन कोणती आणि हे कसे शक्य आहे, हे अर्थातच रंजक आहे.

सध्या भारतीय रेल्वेच्या १० हजारांहून अधिक गाड्या धावत आहेत. यामध्ये वंदे भारत, शताब्दी, राजधानी, एक्सप्रेस, मेल, पॅसेंजर आणि लोकल यासारख्या प्रीमियम ट्रेनचा समावेश आहे. या गाड्यांमध्ये ज्या गाड्या कमी अंतराच्या दरम्यान धावतात, म्हणजेच जास्तीत जास्त २४ तासांचा प्रवास असतो, त्या एका वेळी फक्त एका स्थानकावर असतात; परंतु ज्या गाड्या २४ तासांपेक्षा जास्त लागतात, त्या एका वेळी दोन स्थानकांवर असतात आणि गाड्या एका वेळी तीन स्थानकांवर ४८ तासांपेक्षा जास्त वेळ लागतो. या गाड्या नियमित आहेत म्हणजेच दररोज धावतात. एकाच वेळी दोन स्थानकांवरून धावणाऱ्या गाड्यांची संख्या अनेक आहे; मात्र तीन स्थानकांवरून एकाच वेळी एकच गाडी धावते.

ही ट्रेन आहे अवध आसाम एक्स्प्रेस. या ट्रेनचा क्रमांक आहे १५९०९/१५९१०. देशातील सर्वात लांब पल्ल्याची ट्रेन. ही ट्रेन आसाममधील दिब्रुगड ते राजस्थानमधील लालगढपर्यंत धावते. या कालावधीत ३१०० कि.मी. पेक्षा जास्त अंतर पार करते.

दररोज चालणाऱ्या अवध-आसाम एक्स्प्रेससाठी ७ ट्रेनची गरज पडते कारण स्टेशनपासून सुरू झाल्यापासून चौथ्या दिवशी ट्रेनच्या शेवटच्या स्टेशनवर पोहोचते. त्यामुळे दोन्ही बाजूंनी तीन-तीन ट्रेनची गरज पडते. ज्यामुळे ट्रेन दररोज चालेल. एक ट्रेन अतिरिक्त असते.

अवध आसाम एक्स्प्रेस दिब्रुगडहून सकाळी १०.२० वाजता सुटते. दुसरी ट्रेन ११६६ किमी अंतरावर असलेल्या बिहारमधील कटियार जंक्शन येथून सकाळी १०.४५ वाजता निघते. जी दिब्रुगढपासून एक दिवस आधी सुरू होते. त्याचवेळी तिसरी ट्रेन २२४७ कि.मी. दूर उत्तर प्रदेशातील बरेली स्टेशनवर सकाळी १०.३८ वाजता पोहोचते. ही ट्रेन दिब्रुगडहून दोन दिवसांपूर्वी निघालेली असते. याचमुळे एकाच क्रमांकाच्या तीन रेल्वे तीन ठिकाणी दिसून येणे शक्य होते.

## चाळीशीतील चष्मा घालवण्यासाठी...

डॉ. वर्धमान कांकरिया,
नेत्ररोगतज्ज्ञ, संपर्क : ८८८८९४२२२२

वयाच्या चाळीशीच्या उंबरठ्यावर पाऊल टाकताना अनेकांना एक सामायिक अनुभव येतो, तो म्हणजेह वाचन करताना, मोबाईल पाहताना किंवा जवळची कोणतीही वस्तू नीट दिसेनाशी होते. अक्षरे धूसर भासतात, डोळ्यांवर ताण येतो आणि अखेरीस 'वाचनाचा चष्मा' हा रोजच्या जीवनाचा भाग बनतो. नेत्रतज्ज्ञांच्या भाषेत या अवस्थेला 'प्रेसबायोपिया'



असे म्हणतात. वयानुसार डोळ्यांतील नैसर्गिक लेन्स कठीण आणि कमी लवचिक होतात. यामुळे जवळच्या वस्तूंवर फोकस करण्याची क्षमता कमी होते.

मात्र, आधुनिक नेत्रविज्ञानाने यावर अनेक सुरक्षित व परिणामकारक उपाय शोधले आहेत. आज तंत्रज्ञानाच्या मदतीने चाळीशीपुढील व्यक्तींनाही चष्म्याशिवाय स्पष्ट आणि स्वच्छ दृष्टी मिळू शकते.

### लॅसिक लेसर म्हणजे काय?

डोळ्याची रचना फोटो काढण्याच्या कॅमेऱ्यासारखी असते. त्यात डोळ्याच्या पुढच्या बाजूला असलेल्या भिंगातून प्रकाशकिरण डोळ्यात प्रवेश करतात आणि समोरच्या दृष्याची प्रतिमा डोळ्याच्या मागच्या बाजूला असलेल्या नेत्रपटलावर (रेटिना) पडते. काही कारणांमुळे ही प्रतिमा नेत्रपटलाच्या थोडी पुढे किंवा मागे पडते आणि ते दृष्य आपल्याला अस्पष्ट किंवा धूसर दिसू लागते. समोरच्या दृष्याची प्रतिमा पुन्हा बरोबर नेत्रपटलावर पाडण्यासाठी बुब्बुळावर एक शस्त्रक्रिया केली जाते. या शस्त्रक्रियेला लॅसिक असे म्हणतात.

### काय आहे आधुनिक तंत्रज्ञान?

**मोनोव्हिजन लॅसिक** : या पद्धतीत एका डोळ्याची दृष्टि लांबच्या वस्तूंसाठी आणि दुसऱ्या डोळ्याची दृष्टि जवळच्या वस्तूंसाठी सुधारली जाते. प्रक्रिया सोपी असली तरी काहींना दोन्ही डोळ्यांतल्या या समतोलाला जुळवून घेण्यास थोडा वेळ जावा लागतो. पण बहुतेकांसाठी हा प्रभावी पर्याय ठरतो.

**ब्लेंडेड व्हिजन लॅसिक** : ही पद्धत मोनोव्हिजनपेक्षा अधिक नैसर्गिक व सुसंगत आहे. यात दोन्ही डोळ्यांची दृष्टि विशिष्ट प्रकारे समायोजित केली जाते. यामुळे लांबपासून मध्यम अंतरापर्यंतच्या वस्तू स्पष्ट दिसतात. वाचनासोबतच दैनंदिन कामांमध्ये याचा चांगला उपयोग होतो.

**प्रिमियम लेन्स इम्प्लांटस्** : ट्रायफोकल, इडीओएफ किंवा ॲकोमोडेटिव्ह प्रकारच्या लेन्सेसमुळे लांब, मध्यम आणि जवळचे सर्व अंतर स्पष्ट दिसू शकते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ही प्रक्रिया केल्यामुळे भविष्यात मोतीबिंदू होण्याची शक्यता कमी होते.

या सर्व प्रक्रियांमध्ये रुग्णांचे डोळे फक्त औषधाने (टॉपिकल ॲनेस्थेशिया) सुन्न केले जाते. उल्लेखनीय बाब म्हणजे, अवघ्या दहा मिनिटांत उपचार पूर्ण होतात आणि रुग्ण तीन-चार दिवसांतच नेहमीच्या कामाला परतू शकतो.

गेल्या चार दशकांमध्ये लेझर प्रक्रियेद्वारे दृष्टीदोष निवारणाचे आणि मोतीबिंदू उपचारांचे कार्य करताना दोन लाखांहून अधिक रुग्णांनी चष्मामुक्ती मिळवली आहे. आज नेत्रविज्ञान इतके प्रगत झाले आहे की चाळीशीपुढे चष्मा लावणे हा एकमेव पर्याय राहिलेला नाही. लॅसिकपासून प्रिमियम लेन्स इम्प्लांट्सपर्यंत अनेक पर्याय उपलब्ध असून ते चाळीशी-पन्नाशीनंतरही चष्म्याविना स्पष्ट दृष्टी देऊ शकतात.

### जावेला आधी पिझ्झा दिल्याच्या कारणावरून

## पत्नीने भावांकरवी नवऱ्याला केली मारहाण


लहानांपासून मोठ्यापर्यंत सगळेच जण चवीने पिझ्झा खातात. पण नुकताच या पिझ्झावरुन एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पिझ्झा वाटण्यावरुन एका कुटुंबात वाद झाला आहे. हा वाद इतका विकोपाला गेला की, एका महिलेला तिच्या जावेच्या भावांनी चक्क गोळी मारली आहे. या प्रकरणात चार लोकांना अटक करण्यात आलं आहे. पोलिसाकडून याप्रकरणी चार लोकांना अटक करण्यात आलं आहे. ही घटना दक्षिण पूर्व दिल्लीतील सीलमपूरमधील आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले की, जीटीबी रुग्णालयात सीलमपुर पोलिस ठाण्यात याबाबत सांगण्यात आले की, एक महिला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तेव्हा हे प्रकरण उघडकीस आले आहे. प्राथमिक चाचणीत समोर आळं आहे की, पीडिताचे दीर झिशान यांनी संपूर्ण कुटुंबासाठी पिझ्झा आणले. त्यांनी आपला लहान भाऊ जावेद यांच्या पत्नीला सादमासह सगळ्या लोकांना पिझ्झा दिला.

अधिकाऱ्यांनी सांगितलं की, झिशानची पत्नी सादियाला सादमाला पहिली पिझ्झा दिला ते आवडलं नाही. पतीने पहिला पिझ्झा आपल्या जावेला दिला यावरुन ती नाराज झाली आणि तिने वाद केला. यावरुनच तिघांमध्ये वाद झाला. पुढे अधिकारी म्हणाले की, २१ वर्षीय सादियाचा पती झिशान आणि सासरच्या संपूर्ण कुटुंबाशी वाद होता.

एके दिवशी रात्री सादियाने आपल्या चारही भावांना बोलावलं. मुनताहिर, तफसीर, शहजाद आणि गुलरेज यांना आपल्या घरी बोलावलं. त्यांचा देखील सादियाच्या सासरच्या मंडळींशी वाद झाला. या दरम्यान मुतांहिरने गोळी झाडी जी थेट झिशानलचा लहान भाऊ जावेदच्या पत्नीला लागली.

पोलिसांनी सांगितले की, सदमाच्या पोटात



गोळी लागली असून तिच्यावर जीटीबी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मुनताहिर, तफसीर, शहजाद आणि गुलरेज यांना घटनास्थळावरुन अटक करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाची चौकशी करण्यात येत आहे. पीडितेच्या कुटुंबातील एका सदस्याने सांगितले की, सादियाने पिझ्झा वाटपावर आक्षेप घेतला तेव्हा झिशान कुटुंबातील मंडळींना पिझ्झा देत होता. तो म्हणाला, झिशान, सादिया आणि सदमा यांच्यात भांडण झाले होते.

सादियाने सदमाचे डोके भिंतीवर आपटण्यास सुरुवात केली. यानंतर ती तेथून निघून गेली आणि गाझियाबादहून आलेल्या भावांना फोन केला. तिच्या भावांनी कुटुंबातील सर्व सदस्यांना शिवीगाळ केली आणि त्यातील एकाने सादियाला गोळ्या घातल्या. गोळ्यांचा आवाज ऐकून अनेक शेजारी घटनास्थळी जमा झाले आणि त्यांनी सादियाच्या भावांना एका खोलीत बंद केले, त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. पीडितेच्या नातेवाईकाने सांगितले की, आरोपी या भावांपैकी एक होता. पिस्तूल घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला आणि दहशत निर्माण करण्यासाठी हवेत गोळ्या झाडल्या, परंतु स्थानिक रहिवाशांनी त्याला पकडले.

# लग्नाचे अमिष दाखवून वेळोवेळी बलात्कार केल्याप्रकरणी न्यायालयाकडून आरोपीस अटकपूर्व जामीन मंजूर

नगर – कलकत्ता येथील पिडीत व आरोपी विनोद राजपुत यांची शादी डॉटकॉम या मॅट्रीमोनिअल साईटवर ओळख झाली व त्यातून त्यांचे प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने पिडीता हिस लग्नाचे अमिष दाखवून जवळीक साधली व घर घेण्याकरीता रक्कम रुपये १,८०,००० रोख स्वरुपात घेतले व कलकत्ता येथे जाऊन पिडीतेच्या आई वडिलांना भेटून त्यांना विश्वासात घेऊन पिडीतेबरोबर लग्न करणार असे सांगून तिला अहिल्यानगर येथे घेवून येऊन वारंवार लग्नाचे अमिष दाखवून जबरदस्तीने बलत्कार केला. पिडीतेने लग्न कधी करणार यावाबत विचारले असता, आणखी दोन लाख रुपये दे, नाहीतर तुझे माझ्यासोबतचे फोटो प्रसिध्द करीन अशी धमकी दिली व विवाहास नकार दिला.

त्यानंतर आरोपी सकाळी व्यायामाला जिममध्ये गेला असता, पिडीता तेथे गेली व विवाहासबंधी विचारु लागली असता, आरोपीने पिडीतेस जिममध्ये २ मे २०२५ रोजी मारहाण केली, सदरची संपुर्ण घटना ही सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली. त्यानंतर पिडीतेने कोतवाली पोलिस स्टेशन येथे आरोपी विरुध्द बीएनएस कलम ६४ (१), ६९, ११५ (२), ११५ (२), ३५१ (२), ३५२ नुसार फिर्याद दिली व आरोपी विरुध्द गुन्हा दाखल केला. त्यावर आरोपी याने अहमदनगर येथील सत्र न्यायालयामध्ये जामीन ठेवला असता, तो फेटाळला गेला व त्यानंतर आरोपी याने अ‍ॅड. संजय दुशिंग, अ‍ॅड. महेश तवले व अ‍ॅड. देवांशु धोकरीया यांच्यामार्फत उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे अटकपूर्व जामीन दाखल केला. आरोपीच्या वतीने बचाव करण्यात आला की, पिडीता हिच आरोपीला हनीट्रॅप व ब्लॅकमेल करत आहे व आरोपीकडून पैसे काढण्याच्या हेतूने त्याच्याविरुध्द खोटा गुन्हा दाखल केला आहे. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी अ‍ॅड. संजय दुशिंग व अ‍ॅड. देवांशु धोकारीया यांचा युक्तीवाद मान्य करुन आरोपी यास अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

# मखदुम सोसायटीतर्फे नगरमध्ये गणेश फेस्टिवलमध्ये ३० ऑगस्ट रोजी गीत-ग़ज़ल-मुशायऱ्याचे आयोजन

नगर – गणेशोत्सवाच्या निमित्ताने मखदुम सोसायटी व नगर व्यासपीठ तर्फे गणेश फेस्टिवल मध्ये विविधरंगी सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत ३० ऑगस्ट रोजी संध्याकाळी ७.३० ते रात्री ९.३० या वेळेत सर्जेपुरा येथील रहेमत सुलतान हॉल येथे गीत, ग़ज़ल आणि मुशायरा रंगणार असल्याचे मखदुम सोसायटीचे अध्यक्ष आबीद खान यांनी सांगितले.



शादाब अंजुम (नागपूर), इमरान राशिद (मालेगाव), अमित झा राही (पुणे), डॉ. कमर सुरुर, बिलाल अहमदनगरी, शाकिर अहमद (जामखेड), आबिद खान, सुनिल भंडारी, संजय भिंगारदिवे, डॉ. दमन काशिद, अ‍ॅड. अमिन धारणी, दिनेश मंजरतकर, सईद खान, जावेद मास्टर

या कार्यक्रमात नागपूरचे शायर शादाब अंजुम, मालेगावचे इमरान राशिद, पुण्याचे अमित झा राही, डॉ. कमर सुरुर, बिलाल अहमदनगरी व शाकीर अहमद (जामखेड) व श्रीरामपूरचे जाकीर सर हे आपल्या ग़ज़लांनी रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत. तसेच गायक सुनिल भंडारी, संजय भिंगारदिवे, डॉ. दमण काशिद, अ‍ॅड. अमीन धाराणी, दिनेश मंजरतकर, सईद खान व जावेद मास्टर हे कलाकार गीत-संगीताची बहार सादर करणार आहेत. असे कवयित्री डॉ. कमर सुरुर यांनी सांगितले.

नगरकरांसाठी एक आगळावेगळा सांस्कृतिक मेजवानी ठरणारा हा कार्यक्रम असल्याने नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन राजुभाई शेख यांनी केले आहे.

# गुटखा बनविण्यासाठी गुजरातला चालवलेला सुपारी व तंबाखुचा साठा पोलिसांनी पकडला; ८ कोटी ४३ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल केला जप्त

नगर – कर्नाटक राज्यातून कर चुकवून आणलेली गुटखा बनविण्यासाठी गुजरातला घेवून जात असलेल्या सुपारी व तंबाखुचा मोठा साठा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने राहुरी परिसरात पकडला आहे. या कारवाईत तब्बल ८ कोटी ४३ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



गुजरातला चालवलेला सुपारी व तंबाखुचा साठा पकडल्यानंतर त्याच्या सोबत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांना जिल्ह्यातील अवैध धंद्याची माहिती काढून अवैध धंद्याचे समूळ उच्चाटन करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार या कारवाईसाठी स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार रमेश गांगर्डे, गणेश लबडे, राहुल द्वारके, लक्ष्मण खोकले, भिमराज खसे, रिचर्ड गायकवाड, राहुल डोके, सतिष भवर, सुनिल मालणकर, महादेव भांड, उमाकांत गावडे यांचे पथक नियुक्त करण्यात आलेले आहे. सदर पथक अवैध धंद्यांची माहिती घेत असताना त्यांना माहिती मिळाली की, गुटखा बनविण्यासाठी लागणारी सडलेली लाल रंगाची सुपारी, तंबाखू असे अवैध रित्या कर्नाटक मधून आणून तेथुन गुजरात राज्यामध्ये गुटखा बनविण्यासाठी शासनाचा कर चुकवून व बनावट बिले तयार करुन जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने चिंचोली (ता. राहुरी) गांवचे शिवारात हॉटेल महालक्ष्मी, चौधरी पॅलेस येथे सापळा रचून वाहने व ट्रक चालक यांना ताब्यात घेण्यात आले.

त्यामध्ये अबरार अल्लाउद्दीन खान (वय ३० वर्षे, रा. साखरस, ता. फिरोजपुर, जिल्हा नुह, हरियाण) तोफिक हनिफ खान (वय ३० वर्षे, रा. बिरसिका, ता. जि. नुह, हरियाणा), अक्रम इसब खान (वय २८ वर्षे, रा. बिलंग, ता. कामा, जि. भरतपुर, राजस्थान), इर्शाद ताजमोहमंद मेह (वय ३०, रा. उंबरी, ता. फिरोजपुर, जि. नुह, हरियाना), अशोक पोपट पारे (वय ४७ वर्षे, रा. मिरजगांव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर), रखमाजी लक्ष्मण मगर (वय ३४ रा. पाटेगांव, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर), कालीदास बाबुराव काकडे (वय ६३, रा. मु.पो. सावडी, ता. करमाळा, जि. सोलापुर), आसिफ पप्पु मेव (वय २६ रा. आकेडा, ता. नुह, हरियाणा), जमशेर अब्दुल रज्ज़ाक खान (वय ४५ रा. करवडी, ता. पुनाहना, जि. मेवाद, हरियाना), सचिन जिजाबा माने (वय ३९ रा. ५०० बंगला, शेजारी, केडगांव, जि. अहिल्यानगर)

ट्रकमध्ये लाल सुपारी व तंबाखू असल्याचे दिसून आले. चालकांकडे त्यांचे ताब्यातील सुपारी व तंबाखूबाबत विचारपुस करता त्यांनी सदरची सुपारी व तंबाखु ही वाहन मालक मोहंमद अक्रम (रा. कर्नाटक) याची असून त्यांचे सांगणेप्रमाणे सदरची सुपारी व तंबाखु ही गुजरात राज्यामध्ये गुटखा बनविण्यासाठी नेत असल्याचे सांगितले, त्यांचेकडे सुपारी व तंबाखू वाहतुक परवान्याबाबत बाबत विचारपूस करता त्यांचेकडे कोणतेही ई वे बिल मिळून आले नसुन बिल्टीची पाहणी करता सदरची बिल्टी ही संगणीकृत नसुन हस्तलिखीत बनावट तयार करण्यात आल्याचे व माल पोचविण्याचा पत्ता दिल्ली असा नमूद केलेला आहे. त्यामुळे वरील ट्रक चालकांकडे मिळून आलेली सडलेली लाल सुपारी व तंबाखु ही कर चुकवून व बनावट बिले तयार करुन आणली असल्याची प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने पोलिसांनी ६ कोटी १७ लाख ८५ हजार रुपये किमतीची २.०५.९५० किलो लाल सुपारी, १५ लाख ६० हजार रुपये किमतीची ७८०० किलो तंबाखु व २ कोटी १० लाख रुपये किमतीचे १३ वाहने असा एकुण ८ कोटी ४३ लाख ४५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन मिळुन आलेली सुपारी व तंबाखु बाबत खात्री करुन कारवाई करणेबाबत राज्य कर सह आयुक्त, वस्तु आणि कर सेवा विभाग अहिल्यानगर यांना पत्रव्यवहार करण्यात आला आहे. पुढील कारवाई वस्तु आणि कर सेवा विभाग अहिल्यानगर यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

# नगरमध्ये १६ सप्टेंबर रोजी उद्योजक मेळाव्याचे आयोजन

नगर – कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग तसेच डेअसरा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत सेमिनार हॉल, लायब्ररी बिल्डिंग, न्यु आर्टस् कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, लालटाकी रोड, अहिल्यानगर येथे उद्योजक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. इच्छूक उमेदवारांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार म. पंतम यांनी केले.

जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील लघू उद्योजकांना एकत्र आणून ज्ञानाची देवाणघेवाण व नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देणे हा मेळाव्याचा उद्देश आहे. सोशल मीडिया व डिजिटल मार्केटिंगद्वारे व्यवसायवाढीबाबत तज्ञ मार्गदर्शन करतील. तसेच सूक्ष्म व लघू उद्योजकांच्या प्रश्नांना अचूक उत्तरे, उपयुक्त टिप्स व मोफत मार्गदर्शनही दिले जाणार आहे. उद्योजक मेळाव्यात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/KyWejbvw8CDZ1CV89 या लिंकवर नोंदणी करावी.

अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्र. ०२४१-२९९५७३५ वर संपर्क साधावा. तसेच उद्योजक मेळावा समन्वयक वसीमखान पठाण (मो. ९४०९५५५४६५), संतोष वाघ (मो. ८८३०२१३९७६), बद्रिनाथ आव्हाड (मो. ९४२०७२५२८०) व योगेश झांजे (मो. ९५८८४०८८९०) यांच्याशी संपर्क साधावा, असे कळविण्यात आले आहे.

# गुरुवर्य पोट्यन्ना बतीन शैक्षणिक मंडळाच्या वतीने पदव्युत्तर धारकांचा ७ सप्टेंबर रोजी सत्कार सोहळा

### पद्मशाली समाजातील पदवीधारकांना आवाहन

नगर – अहिल्यानगर येथील गुरुवर्य पोट्यन्ना बतीन शैक्षणिक सामाजिक मंडळ यांच्या वतीने सालाबाद प्रमाणे ७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता सण २०२५ या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या पदवी, पदविका व पदव्युत्तर धारकांचा व शिक्षक दिनानिमित्त पद्मशाली समाजातील सेवेतील व सेवानिवृत्त शिक्षकांचा सत्कार समारंभ संपन्न होणार आहे.

पद्मशाली समाजातील सर्व पदवीधारकांनी पुढील मोबाईल क्रमांकावर किंवा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांकडे संपर्क साधून आपल्या प्रमाणपत्राच्या छायांकित प्रति सह आपली नावे नोंदवावी, असे आवाहन मंडळाचे अध्यक्ष प्रा.बाळकृष्ण सिद्धम, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर मंगलारम व सचिव प्रा. बाळकृष्ण गोटीपामूल यांनी केले आहे.

संपर्क व नाव नोंदणीसाठी शंकरराव नक्का मो. क्र.९८ ६० ८४ ७१ ८४ (रंगार गल्ली राधाकृष्ण मंदिर जवळ), नारायण एक्कलदेवी मो. क्र. ९४ २३ ७५ ०९ ८४ (दातरंग मळा), मारुती आरकल मो. क्र. ९८ ५० २२ ९९ ३१ (वसंत टेकडी नित्यसेवा सोसायटी) यांच्याशी संपर्क साधावा.



रोटरी क्लबतर्फे नेप्ती विद्यालयात शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

# नेप्ती विद्यालयात रोटरी क्लबतर्फे शालेय साहित्य वाटप

नगर – ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवासासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या हेतूने हडपसर येथील रोटरी क्लबच्या वतीने नेप्ती येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विद्यालयात शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. मंगळवारी झालेल्या या कार्यक्रमास ग्रामस्थांनी प्रतिसाद दिला. यावेळी क्लबचे अध्यक्ष संभाजी काकडे, अनिल रासकर, मुकुल सिन्हा, सागर कांडेकर आदी उपस्थित होते. पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना पेन, वह्या, स्कूल बॅग, पेन्सिल बॉक्स आदी आवश्यक साहित्य देण्यात आले. या उपक्रमासाठी सबाजी कांडेकर यांनी विशेष प्रयत्न केले.

कार्यक्रमास विद्यालयाचे मुख्याध्यापक महेश जाधव, संस्थेचे अर्जुन होळकर, दिलीपराव होळकर, ग्रामसेवक नानासाहेब घोडके, संतोष खरमाळे, गोरक्ष कोतकर, बाबा भोर, सविता कोरडे, राधा वामन, बाबुलाल सय्यद, शिवाजी जाधव, गणेश चौरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या चेहर्यावर समाधान व आनंद पाहून वातावरण भारावून गेले.

यावेळी अध्यक्ष संभाजी काकडे म्हणाले, गावातील विद्यार्थी मोठ्या शहरांतील मुलांइतकेच हुशार व जिज्ञासू आहेत, पण त्यांना संधी आणि सुविधा कमी मिळतात. शिक्षण हीच खरी शक्ती असून त्यातूनच व्यक्ती घडते व समाज प्रगती करतो. रोटरी क्लबच्या माध्यमातून आम्ही ग्रामीण भागातील प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत शैक्षणिक मदतीचा हात पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत. येणार्या काळातही आम्ही असेच उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीत सोबती होऊ.

तसेच ते पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांनी दिलेल्या साधनांचा योग्य उपयोग करून अभ्यासात प्रगती साधावी. अभ्यासाबरोबरच क्रीडा, सांस्कृतिक व सामाजिक उपक्रमातही सक्रिय सहभाग घ्यावा. शालेय जीवन हीच खरी पायरी असून यश मिळवण्यासाठी चिकाटी, परिश्रम व आत्मविश्वास या तीन गोष्टी अंगीकारल्या पाहिजेत. रोटरी क्लब आपल्या पाठीशी उभा आहे, याची हमी आम्ही देतो.

रोटरी क्लब यांनी हे साहित्य 'प्रुडेंट कार्पोरेट डवायजरी सर्व्हिसेस लिमिटेड' यांच्या सीएसआर फंडामार्फत उपलब्ध करून दिले.

प्रास्ताविक करताना संस्थेचे अर्जुन होळकर म्हणाले, विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य मिळाल्यास त्यांचा आत्मविश्वास दुणावतो आणि ते अधिक उत्साहाने शिक्षण घेऊ शकतात. आजच्या या उपक्रमामुळे आपल्या शाळेतील विद्यार्थीही इतरांच्या बरोबरीने उभे राहतील, ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. समाजातील दानशूर व्यक्तींनी अशा प्रकारच्या उपक्रमात पुढाकार घेतल्यास शिक्षणाच्या वाटचालीला नवे बळ मिळेल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीपराव होळकर यांनी केले तर राजेंद्र झावरे यांनी आभार मानले.

# आधारभूत किंमत खरेदी योजनेच्या लाभासाठी विहित वेळेत ई-पिक पाहणी पूर्ण करण्यात यावी

नगर – केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घेण्यासाठी सर्व शेतकऱ्यांनी आपल्या पिकांची ई-पिक पाहणी शासनाने दिलेल्या कालावधीत पूर्ण करावी, असे आवाहन अहिल्यानगर येथील जिल्हा पणन अधिकाऱ्यांनी केले आहे.

२०२५-२६ हंगामात केंद्र शासनाने जाहीर केलेल्या आधारभूत दरानुसार, नाफेड व एनसीसीएफ यांच्या वतीने पणन महासंघामार्फत राज्यातील कडधान्य व तेलबिया (मूग, उडीद, सोयाबीन व तुर) खरेदी करण्यात येणार आहे. आधारभूत दराने खरेदीकरिता शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर ई-पिक पाहणीची नोंद असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी ही खरेदी प्रक्रिया पारदर्शक व कार्यक्षम ठेवून ती पूर्णतः ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पणन कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

# घरगुती गणेशोत्सवात 'मिशन सिंदूर'चा देखावा; शौर्यगाथा सांगणारा उपक्रम

नगर – एकदंत कॉलनी येथील रहिवासी श्रीकांत आडेप यांनी 'मिशन ऑपरेशन सिंदूर' या देखाव्याद्वारे भारतीय लष्कर, हवाई दल व नौदलाने केलेल्या शौर्यगाथा व पाकिस्तानविरुद्ध केलेल्या लढाया यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे. हा देखावा श्री गणरायाच्या मूर्तीभोवती उभारला आहे. मध्यभागी तिरंगा झेंड्याच्या साक्षीने गणपती विराजमान असून भोवती टँक, युद्धनौका, फायटर जेट्स व शस्त्रास्त्रे यांच्या प्रतिकृती सजविण्यात आल्या आहेत. मिशन सिंदूरमध्ये मोलाची भूमिका बजावणाऱ्या विंग कमांडर व्योमिका सिंग (भारतीय हवाई दलातील पहिली महिला फायटर पायलट) आणि मेजर जनरल सोफिया कुरेशी (भारतीय लष्करातील वरिष्ठ अधिकारी) यांच्या कटआऊट्सने या देखाव्याला वेगळेच रूप प्राप्त झाले आहे.





एकदंत कॉलनी येथील रहिवासी श्रीकांत आडेप यांनी 'मिशन ऑपरेशन सिंदूर' या देखाव्याद्वारे भारतीय लष्कर, हवाई दल व नौदलाने केलेल्या शौर्यगाथा व पाकिस्तानविरुद्ध केलेल्या लढाया यांचे प्रभावी चित्रण करण्यात आले आहे.

या देखाव्यात भारतीय सैन्याने केलेल्या महत्त्वाच्या युद्ध मोहिमांची माहिती देणारे फलकही लावलेले आहेत. यामध्ये – १९४७-४८ भारत-पाकिस्तान युद्ध – जम्मू-काश्मीरवरील हल्ल्याला प्रत्युत्तर देताना भारतीय सैन्याचा विजय., १९६५ ऑपरेशन जिब्राल्टर – पाकिस्तानच्या गुप्त कारवायांना चोख प्रत्युत्तर देत भारतीय सैन्याने दाखवलेले शौर्य., १९९९ कारगिल विजय (ऑपरेशन विजय) – कारगिल युद्धात भारतीय सैन्याने मिळवलेला ऐतिहासिक विजय., २०१६ सर्जिकल स्ट्राईक – उरी येथे झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्यानंतर भारतीय सैन्याने पाकिस्तान अधिकृत काश्मीरमध्ये घुसून केलेली धाडसी कारवाई. या फलकांवर सर्जिकल स्ट्राईक ज्या-ज्या ठिकाणी करण्यात आले त्यांची छायाचित्रे प्रदर्शित करून पाहणाऱ्यांना त्या ऐतिहासिक क्षणांची अनुभूती दिली आहे., २०२५ ऑपरेशन महादेव – अलीकडील काळातील महत्त्वपूर्ण लष्करी कारवाईचे गौरवशाली चित्रण. याशिवाय, भारताकडे असलेल्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची छायाचित्रे आणि संक्षिप्त माहितीही या देखाव्यातील फलकांवर देण्यात आली आहे. यात S-400 ट्रायम्फ मिसाईल डिफेन्स सिस्टीम, ब्रह्मोस सुपरसॉनिक क्रूझ मिसाईल, तेजस फायटर जेट, अरिहंत अणुबोट यांसारख्या सामर्थ्यशाली शस्त्रांची नावे व वैशिष्ट्ये अधोरेखित केली आहेत. त्यामुळे भारतीय सैन्याची ताकद व सज्जता स्पष्टपणे समोर येते. या देखाव्यासाठी त्यांना त्यांच्या पत्नी सपना आडेप आणि मुलगी सृष्टी आडेप व मित्र अमोल गाजेंगी, रोशन सुंकी, अमित असाल, अमर सादुल, ओंकार बुरगुल, ऋषिकेश दुडगु यांचे सहकार्य लाभले आहे.

# भंडारी आर्ट क्लासेसच्या विद्यार्थ्यांनी साकारली गणरायाची विलोभनीय चित्रे

नगर – नगरच्या सारसनगर येथील भंडारी आर्ट क्लासेसच्या विद्यार्थ्यांनीही गणेशोत्सवा-निमित्त गणेशाची सुंदर चित्र रेखाटून गणेशोत्सव साजरा केला आहे.





संचालिका सोनिया भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या चित्रांचे कला रसिकांनी कौतुक केले आहे.

क्लासची विद्यार्थीनी गायत्री कचरे हिने ऑईल कलर वापरुन फेटेधारी गणरायाचे सुंदर चित्र काढले आहे. तर दिव्या कोठारी हिने झोपाळ्यावर आनंदाने विराजमान बाल गणेशाचे कलर पेन्सिल पोट्रेट साकारला आहे. याशिवाय अन्य विद्यार्थ्यांनीही मनोहारी चित्र रेखाटून आपले कलागुण सादर केले आहेत.



### प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये बाप्पांचे आगमन उत्साहात

प्रवरा मेडिकल ट्रस्ट कॉलेज ऑफ फार्मसी, शेवगाव येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी २७/०८/२०२५ रोजी सकाळी ११ वाजता श्री गणेशाची प्रतिष्ठापना प्रा. गणेश कर्डिले यांच्या हस्ते झाली. यावेळी कॉलेजचे प्राचार्य महेश भालसिंग, विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

